आतील पानात...
३ पाकिस्तान मुर्दाबाद च्या नाऱ्याने पाषाण परिसर दुमदुमला
४ कुस्तीच्या आखाड्यात उतरला नऊ महिन्याचा "राया" पहिलवान
५ शाळेच्या इमारतीसाठी जागामालकांचा रस्ता बंद करण्याचा डाव

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
# जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध
RNI NO. MAHMAR/2013/57952

पान ८ वर

गुरुवार, दि. ०१ मे २०२५ | वर्ष : १३ | अंक : ११४ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com



# पहलगाम येथील घटना हा देशावरचा हल्ला; धर्म, जात, बाजुला ठेवून एकत्र यावे लागेल

## शरद पवार : विशेष अधिवेशन घेणं उपयुक्त ठरेल

जनप्रवास : प्रतिनिधी

ठाणे : पहलगाममध्ये जे झालं तो देशावरचा हल्ला आहे. या हल्ल्यात धर्म, जात, प्रांत, भाषा या गोष्टी महत्वाच्या नाहीत. देशवासीय म्हणून कशाचीही अपेक्षा न करता आपल्याला एकत्र यावं लागेल. देशाचे पंतप्रधान आणि अन्य सहकारी हे यासंबंधी जी उपाय योजना करतील त्याला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. हीच भूमिका आम ची आहे. पहलगाम प्रश्न विशेष अधिवेशन बोलवण्याची जी मागणी केली आहे ती योग्यच आहे. कारण पहलगाम प्रश्नी संपूर्ण देश एक आहे. कुठलाही पक्ष सरकारच्या भूमिकेच्या विरोधात नाहीत हे दाखवण्यासाठी विशेष अधिवेशन घेणं हे उपयुक्त ठरेल असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे.

ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते आज (बुधवार) प्रति तुळजापूर मंदिरात देवीची पूजा करण्यात आली. जितेंद्र आव्हाड यांच्या पुढाकाराने हे मंदिर बांधण्यात आलं आहे. शरद पवार आणि प्रतिभा पवार यांच्या हस्ते या ठिकाणी अक्षय्य तृतीयेच्या दिवशी पूजा करण्यात आली. त्यावेळी शरद पवार यांना पहलगामबाबत प्रश्न विचारण्यात आला त्यावर त्यांनी उत्तर दिलं. तसंच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का? यावरही उत्तर दिलं आहे.



खा. शरद पवार

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का?

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का? हे विचारलं असता शरद पवार म्हणाले की दोन कुटुंबं एकत्र येत असतील तर चांगली बाब आहे. पण आजचा दिवस वेगळा आहे. आज राजकारणावर काही भाष्य नको असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी या प्रश्नावर उत्तर दिलं होतं. जम्मू-काश्मीरम धील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला तर अनेकजण गंभीर जखमी झाले. या दहशतवादी हल्यानंतर संपूर्ण देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. तसंच जगाने या हल्ल्याचा निषेध केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याला पूर्ण स्वातंत्र्य दिलं असल्याची माहिती समोर आली आहे. तसंच काही मंगळवारी मल्लिकार्जुन खरगे यांनी पहलगाम प्रकरणी विशेष अधिवेशन बोलवा अशी मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून केली होती. त्यावर शरद पवार यांनी असं अधिवेशन बोलवणं हे उपयुक्त ठरेल असं म्हटलं आहे.

## यंदाच्या एप्रिलमध्ये तापमानाचा नवा विक्रम

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : यंदाच्या एप्रिलमध्ये तापमानाचा नवा विक्रम नोंदवला गेला आहे. शिवाजीनगर येथे १३ दिवस तापमान ४० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक राहिल्याची नोंद झाली असून, गेल्या दहा वर्षांत २०१६मध्ये ११, २०१९मध्ये १२ दिवस तापमान ४० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक होते. त्यामुळे गेल्या दहा वर्षांत यंदाच्या एप्रिलमधील सर्वाधिक दिवस तापमान ४० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक राहिल्याचे दिसून येत आहे.

तापमानाचा पारा यंदा एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच वाढू लागला. कमाल तापमानासह किमान तापमानातही वाढ झाली आहे. त्यामुळे दिवसभर उन्हाच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. तसेच, शहरात तापमान सरासरीपेक्षा अधिक आहे. कोरडे हवामान, उत्तरेकडून येणारे उष्ण वारे अशा कारणांमुळे तापमानात वाढ होत राहिली आहे.



हवामान विभागाच्या गेल्या दहा वर्षांतील एप्रिलमधील तापमानाचा आढावा घेतला असता, शिवाजीनगर येथे २०१६मध्ये ११ दिवस, २०१९मध्ये १२ दिवस तापमान ४० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक राहिले होते. तर यंदा नवा विक्रम नोंदवला जाऊन गेल्या दहा वर्षांतील सर्वाधिक १३ दिवस तापमान ४० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक राहिले आहे. २०१५मध्ये एक, २०१६मध्ये ११, २०१७मध्ये सहा, २०१८मध्ये दोन, २०१९मध्ये १२, २०२०मध्ये एक, २०२२मध्ये सात, २०२३मध्ये एक, २०२४मध्ये सात दिवस तापमान ४० अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक नोंदवले गेले होते. तर २०२१मध्ये एकदाही तापमानाने चाळीशी गाठली नाही.

## संक्षिप्त

### गोदाम फोडून तांब्याच्या तारा चोरणारी टोळी गजाआड

पुणे (जनप्रवास) : गोदाम फोडून २५ लाख रुपयांच्या तांब्याच्या तारा चोरून पसार झालेल्या टोळीला वाघोली पोलिसांनी गजाआड केले. चोरट्यांकडून सहा लाख ४० हजार रुपयांच्या तांब्याच्या तारा, तसेच टेम्पो असा २४ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

राजेंद्र मोतीचंद जैन (वय ५२, रा. माणकेश्वर बिल्डींग, मुंबई), विनोद श्रीपाल जैन (वय ४०, रा. कामाठीपूरा, मुंबई), सोहेल फिरोज शेख (वय २२, रा. रे रोड, मुंबई) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. वाघोली-लोहगाव रस्त्यावरील जैन वेअर हाऊस, रिमश्री कॉपर इंडिया प्रा. लि. या गोदामाचे कुलूप तोडून चोरट्यांनी २५ लाख रुपयांच्या तांब्याच्या तारा चोरून नेल्याची घटना २८ फेब्रुवारी रोजी घडली होती. तांब्याच्या तारा चोरुन आरोपी टेम्पोतून पसार झाले होते. याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. वाघोली पोलीस ठाण्यातील तपास पथकाकडून आरोपींचा माग काढण्यात येत होता. पोलिसांनी जवळपास १७२ ठिकाणचे सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले होते. तांत्रिक तपास, तसेच सीसीटीव्ही चित्रीकरणावरुन पोलिसांनी आरोपींचा माग काढला.

### भांडणे सोडविण्यास गेलेल्या पितापुत्रांना मारहाण

पुणे (जनप्रवास) : भाडेकरु यांच्यामध्ये लहान मुलांचे कारणावरुन वाद व भांडणतंटा चालू असताना तरुण व त्याचे वडिल ती सोडविण्यासाठी गेले. त्यांनी जमलेल्या लोकांना इकडे कशाला आले असे विचारल्यावरुन वीटभट्टीवर काम करणार्या चौघांनी त्यांना लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने मारहाण करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.याघटनेत दत्तात्रय शंकर पारखी (वय ४०, रा. मुलाणी वस्तीजवळ, माण, ता. मुळशी) हे व त्यांचे वडिल जखमी झाले आहे. पारखी यांच्या फिर्यादीवरुन हिंजवडी पोलिसांनी नवनाथ कैलास मोरे (वय २०), रवी संजय मोरे (वय २६), सचिन संजय मोरे (वय २४, रा. रफिक मुलाणी यांचे वीटभट्टीवर, मुलाणी वस्ती, माणगाव, ता. मुळशी, मुळ रा. ब्राम्हणी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) यांना अटक केली आहे. कैलास मोरे याच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना माणमधील मुलाणी वस्तीजवळ २७ एप्रिल रोजी सायंकाळी साडेसात वाजता घडली.

### उद्याचा अंक नाही

महाराष्ट्र दिनानिमित्त दै. जनप्रवास कार्यालयास गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी सुट्टी असल्याने शुक्रवार दि. २ मे रोजीचा अंक प्रसिध्द होणार नाही, याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार, हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

– व्यवस्थापिका

## व्यावसायिकांना खंडणी मागणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : सराइतांकडून व्यावसायिकांना धमकावून खंडणी मागण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. लष्कर भागातील एका दुकानदाराला धमकावून त्याच्याकडे दरमहा हप्ता मागितल्याप्रकरणी एका सराइताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला, तसेच स्वारगेट भागात दूध विक्री करणाऱ्या तरुणाला धमकावून सराइताने हप्त्याची मागणी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी लष्कर आणि स्वारगेट पोलिसांकडून सराइतांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

लष्कर भागातील सेंटर स्ट्रीट परिसरात एका दुकानदाराला धमकावून त्याच्यकडून १५ हजार ८०० रुपयांची खंडणी उकळण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी एका सराइताला अटक करण्यात आली आहे. अरबाज मैनुद्दीन कुरेशी (वय २८, रा. भीमपूरा, लष्कर आणि राजेवाडी, नाना पेठ ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका व्यावसायिकाने लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराचे लष्कर भागातील सेंटर स्ट्रीट परिसरात दुकान आहे. आरोपी कुरेशीने त्यांना दरमहा हप्ता देण्याची मागणी करुन धमकाविले होते. या भागात व्यवसाय करायचा असेल तर दरमहा हप्ता द्यावा लागेल, अशी धमकी त्याने दिली होती. व्यावसायिकाला जिवे मारण्याची धमकी देऊन त्याच्याकडील १५ हजार ८०० रुपयांची रोकड कुरेशीने लुटली होती. कुरेशीच्या धमकीमुळे घाबरलेल्या व्यावसायिकाने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक तरटे तपास करत आहेत.

## कोल्हापूर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार

### पुणे ग्रामीण पोलीस दल मुख्यालयात वार्षिक निरीक्षण कार्यक्रम संपन्न



जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : कोल्हापूर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांचा पुणे ग्रामीण पोलीस दल मुख्यालय याठिकाणी वार्षिक निरीक्षणाचा नियोजीत कार्यक्रम पार पडला.

यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. तसेच जिल्हा पोलीस पाटील संघटनेकडूनही पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख आणि अतिरिक्त पुलिस अधिक्षक चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पी.टी क्लास, लाठी ड्रिल, गार्डड्रिल, बी.डी.डी.एस प्रात्यक्षिक, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण या दृष्टीकोनातून जमाव विसर्जन प्रात्यक्षिकाचे निरीक्षण केले.

## श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे १८ जूनला प्रस्थान

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : जगद्गुरु संत शिरोमणी तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून १८ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. १९ दिवसांचा प्रवास करून हा पायी पालखी सोहळा ६ जुलै रोजी पंढरीत दाखल होईल. ६ ते १० जुलै रोजी हा पालखी सोहळा पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहे. वारकरी संप्रदायाला ज्या क्षणाची आस लागून असते, त्या आषाढी पालखी प्रस्थानाची घोषणा झाली आहे. यंदा पालखी सोहळ्याचे ३४० वे वर्ष आहे. याबाबतची माहिती देहू संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांनी दिली. श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा १८ जुनला सुरू होणार असून हा सोहळा ६ जुलैला पंढरपूरमध्ये दाखल होईल. येथे पालखी सोहळा ६ जुलै ते ते १० जुलै २०२५ अखेर मुक्कामी असणार आहे. हा पालखी सोहळ्यात तिथीचा क्षय झाल्याने अंथुर्णे येथील मुक्काम रद्द केला आहे. यंदा पालखी लोणी काळभोरपासून पुढे गेल्यानंतर दुपारच्या १ तासाच्या विश्रांतीसाठी शिंदवणे चौकात थांबणार आहे. २१ जुलैला पालखी देहूत दाखल होणार आहे.

भाविकांची सोय व्हावी, दिंडी चालकांना मुक्कामाच्या ठिकाणी लवकरात लवकर पोहचता यावे यासाठी शहरी भागात सायंकाळी ८ वाजता समाज आरती घेण्यात येणार असून त्यानंतर लगेच किर्तन सुरू करण्यात येणार असल्याचे अध्यक्ष मोरे यांनी सांगितले. यंदा पालखी सोहळ्यात तिथीचा क्षय झाल्याने आंथुर्णे येथील मुक्काम रद्द करण्यात आला आहे. जर तिथी वाढली असती तर इंदापूरला दोन मुक्काम झाले असते अशी माहिती पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे यांनी दिली.


सध्या पालखी सोहळा गावातून बाहेर पडण्यास तीन ते चार तास लागतात. याचा विचार करून व गत वर्षी उद्भवलेल्या परिस्थितीनुसार यंदा येथील ग्रामस्थांशी चर्चा करून व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या विनंती अर्जानुसार पालखी सोहळा दुपारच्या एक तासाच्या विसाव्यासाठी शिंदवणे येथील पीडीसीसी बॅंकेसमोर थांबणार असल्याचे पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे यांनी सांगितले.

## पुण्यात पकडलेल्या बनावट नोटांचा पुरवठा परराज्यातून?

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : पुण्यात पकडलेल्या २८ लाखांच्या बनावट नोटांचा पुरवठा परराज्यातून झाल्याची माहिती तपासात मिळाली आहे. परराज्यातील टोळीने देशभरात बनावट नोटा छापून वितरित केल्याचा संशय आहे. या टोळीच्या मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचण्यासाठी पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पोलिसांची पथके परराज्यात रवाना झाली आहेत.

पुणे शहर परिसरात बनावट नोटा चलनात आणणाऱ्या टोळीला गजाआड करण्यात आले. शिवाजीनगर पोलिसांनी केलेल्या कारवाईत दोन महिलांसह पाचजणांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून २८ लाख रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहे. या प्रकरणी पाच आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहे. त्यांची चौकशी सुरू आहे. बनावट निर्मिती, तसेच वितरण करणाऱ्या या टोळीत आणखी काही जण सामील झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.



# अग्रलेख : महाराष्ट्राचा वेग मंदावू लागला

एखाद्यास स्वत:ची प्रगतिशून्यता मान्य नसेल तर त्याने प्रगती करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. विद्यमान महाराष्ट्रास हे सत्य तंतोतंत लागू पडते. त्याची चर्चा करण्याआधी एक सत्य. महाराष्ट्र अर्थातच अप्रगत नाही. देशातील सर्वात प्रगतिशील राज्यांत महाराष्ट्राची गणना होते. पण 'आज इकडे उद्या तिकडे' वृत्तीने लोकप्रतिनिधी आणि काही अ-शरीरी कंत्राटदार आदींची गेल्या काही वर्षांत अभूतपूर्व प्रगती झाली आहे, पण त्याने राज्याचे काहीएक भले झालेले नाही, हे स्पष्ट आहे. आपले सर्व काही उत्तम चाललेले आहे आणि आपणास कोणाचे आव्हान नाही अशा विरोधक निष्प्रभ सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट सरकार आता थांबणार नाही, असा दावा महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पुन्हा सत्ताधारी करत असले तरी प्रगतीचा वेग अगदीच मंदावू लागला आहे हे स्पष्ट आहे.

मुद्दा महाराष्ट्र किती मागास आहे हा अजिबात नाही. तो आहे राज्याच्या प्रगतीची गती किती मंदावली आणि त्याच काळात इतर राज्यांच्या- त्यातही विशेषत: गुजरातच्या- प्रगतीचा वेग किती वाढला हा आहे. तो मोजण्यास दोन घटक पुरेसे आहेत. एक म्हणजे देशाच्या एकूण उत्पन्नात महाराष्ट्राचा असलेला वाटा आणि महाराष्ट्रातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न. या दोन्हीही आघाड्यांवर भले महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे आकडे आणि दावे होत असले तरी गुजरात आणि काही दक्षिणेतील राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची गती मंदावलेली आहे, हे नाकारता येणार नाही. फक्त दाओस आणि त्यातून १५ लाख कोटींच्या गुंतवणुकांचे आणि विकासाचे काल्पनिक वारे वाहू लागले तरी या मंदावलेल्या गतीनंतरही महाराष्ट्र अन्य राज्यांच्या तुलनेत पुढे आहे हे खरे. तथापि महाराष्ट्र आणि अन्य प्रगतिशील राज्ये यांच्यातील अंतर कमी होऊ लागले आहे हेही तितकेच खरे.

आता यात कोणत्या काळात कोण मुख्यमंत्री होते, मुख्यमंत्रीपदी अमुक असताना इतकी गती मंदावली आणि तमुक आल्यावर त्यात वाढ झाली, वगैरे तपशील निरर्थक. त्यातून फक्त स्वत:चे समाधान करता येईल. पण त्यामुळे जमिनीवरचे सत्य अजिबात बदलत नाही. त्यावर भाष्य करताना राजकारणी मंडळी आपापल्या पक्षीय अभिनिवेशानुसार एकमेकांस दोष देतात आणि मंदगतीचे खापर एकमेकांवर फोडण्याचा प्रयत्न करतात. निवडणुकीच्या काळात ही खापर फोडाफोडी अधिक जोमाने होते. हे लांबीने लहान असलेल्या पांघरुणाप्रमाणे. तथापि ही वेळ आपल्यावर नक्की कशामुळे आली याचा विचार करण्यास या राजकीय मंडळींना अजिबात वेळ नाही आणि त्यात त्यांना स्वारस्यही नाही. त्यामुळे सत्तासोपानावरील नाथ अर्धे उतरले आणि पंत चढले, तरी उप म्हणून नाथ, राव आहेतच. परिणामी राज्याच्या भागधेयात अजिबात सुधारणा होताना दिसत नाही. याचे कारण या राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांसमध्ये विरोधकच नव्हे तर सत्ताधाऱ्यांतील तीन पक्षांतही कुरघोड्या आणि फक्त साठमाऱ्यांतच रस आहे, हे आहे. वैयक्तिक हेवेदावे, त्यातून निर्माण झालेले सुडाचे राजकारण, त्यासाठी वाटेल त्या थरास जाण्याची वृत्ती आणि याच्या जोडीला या राजकारण्यांच्या घराघरांत 'लपवून ठेवावे असे काही' बरेच असल्याने त्यामुळे येणारी अपरिहार्यता ही महाराष्ट्राच्या पीछेहाटीची प्रमुख कारणे. केंद्रात सत्ताधारी असलेल्या भाजपने आपल्या प्रशासनात विरोधकांच्या राजकारणापेक्षा त्यांच्या घरांत लपवून ठेवलेल्यावर आपला रोख राखल्याने राजकारणाचा पोत बदलला आणि सत्ताशरणतेस महत्त्व आले. याचा अर्थ विरोधकांकडील 'लपवलेले काही' लपवलेलेच राहायला हवे, असा अजिबात नाही. ते बाहेर येणे आवश्यकच होते आणि त्यावर कारवाईदेखील तितकीच गरजेची होती. पण ही कारवाई म्हणजे त्या सर्वांस आपल्याकडे ओढणे नाही. मात्र तसे होत गेल्याने केंद्रीय सत्ताधारी पक्षाच्या आश्रयास जाणे आणि अभय मिळवणे हेच राजकारण्यांचे ईप्सित बनले. परिणामी प्रशासनावरील लक्ष उडाले आणि प्रशासकीय अधिकारीही आपापल्या पदरात काय पडणार यासाठी आवश्यक समीकरणे रंगवत आहेत. अशा परिस्थितीत राज्याच्या हिताकडे दुर्लक्ष झाले असल्यास नवल ते काय?

यात भरीस भर म्हणजे राज्यातील प्रांताप्रांतात निर्माण झालेले राजकीय सुभेदार. राजकीय पक्षांच्या सततच्या विघटन प्रक्रियेचा परिणाम म्हणजे मोठ्या पक्षांची शकले होत गेली आणि त्यातून तयार होत गेलेल्या लहान लहान शकलांच्या प्रमुखांस हाताळणे 'दिल्लीश्वरांस' अधिक सोपे ठरू लागले. किंबहुना त्याचसाठी मोठ्या पक्षांची राजकीय छाटणी केली गेली. परंतु याचा दुष्परिणाम असा की त्यामुळे लहान लहान सुभेदारांचे पेव फुटले आणि या सुभेदारांस शांत करणे ही नवीच डोकेदुखी प्रशासन आणि संभाव्य गुंतवणूकदार यांच्यासमोर निर्माण झाली. एके काळी हे राज्य प्रशासकीय शिस्त आणि पुरोगामी राजकारण यासाठी ओळखले जात होते. या दोन्हींचा बोऱ्या वाजला. गुंतवणूकदारांवर राज्याचे प्रशासन केंद्र असलेल्या मुंबईतील मंत्रालयापासून उद्योगाच्या/ कारखान्याच्या स्थानापर्यंतच्या साखळीतील प्रत्येक राजकीय सुभेदारास 'शांत करण्याची' वेळ आली. या सुभेदारांची संख्याही वाढली. एके काळी एकाच सत्ताधारी पक्षापुरते मर्यादित असलेले हे सुभेदार सत्ताधारी त्रिपक्षीय झाल्याने तिप्पट वाढले आणि त्याच्या जोडीने मागच्या दारातून आत आलेल्यांची भूक भागवण्याची जबाबदारीही संभाव्य गुंतवणूकदार/ उद्योजक यांच्या डोक्यावर आली. हे सर्व करून दफ्तरदिरंगाई टाळण्याची सोय असती तरी गुंतवणूकदारांनी ते गोड मानून सहन केले असते. पण तेही नाही. म्हणजे पैशापरी पैसा घालवायचा आणि वर काही त्या 'बदल्यात' मिळेल याची हमी नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात गुंतवणूक करणे तितके आकर्षक राहिले नाही. म्हणून महाराष्ट्रास वळसा घालून गुंतवणूकदारांनी गुजरात वा दक्षिणेतील राज्ये जवळ केली आहेत.

म्हणून महाराष्ट्राचे मंदावणेदेखील स्वाभाविक आहे. प्रगतीच्या शिखरावर राहिलेला महाराष्ट्र एका झटक्यात रस्त्यावर आला असे होत नाही. राज्यात गॅपने का होईना सरकारची हॅटट्रिक झाल्याचे दावे आणि पाशवी बहुमतात असलेल्या ट्रिपल इंजिनने लाडकी बहीण, शेतकरी, ज्येष्ठांसह विविध मोफत उधळणीने तिजोरीत खडखडाट झाला आहे. त्यामुळे सर्वच कामांना कात्री लावली जात आहे. आता मंत्री-नेत्यांकडून हे खुलेआम कबूल केले जात आहे. एकूणच सत्ताधाऱ्यांचे बोलघेवडे प्रतिनिधी काहीही दावा करोत; महाराष्ट्राची घसरण निश्चित सुरू झालेली आहे. त्याकडे दुर्लक्ष करून केवळ राजकारणातच ही मंडळी अशीच मशगूल राहिली तर महाराष्ट्र पुरता जमिनीवर आल्याखेरीज राहणार नाही. आजचे मंदावणे उद्या अधोगतीचा धोका असतो. तेव्हा हे वास्तव नाकारून उगाच नको त्याचे समर्थन करण्यात अर्थ नाही.



## अंतरंग

### गरिबीचा गहिवर



वाढत्या महागाईमुळे श्रीमंत गरीब होऊ लागले आहेत. असे एक विधान एका उद्योजकाने केलेले सर्वांच्याच वाचनात आले असेल, गरीबी हा जरी शाप नसला तरी ते एक कठोर वास्तव आहे. ज्याला गरीबीशी आयुष्यभर झगडावे लागते. अशा गरीबीत जगणाऱ्या माणसांच्या असंख्य कथा वेळोवेळी कानी पडत असतात. यातून ज्यांना जगण्याचे भिन्न भिन्न मार्ग सापडतात. अशी मंडळी परोपरीने गरीबीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असतात. हे जरी खरे असले तरी सर्वांनाच आपली परिस्थिती बदलण्याची संधी मिळेलच असे नाही. कारण प्रसंगी संधीसुध्दा निर्माण करावी लागते. आणि त्याकरितासुध्दा वैयक्तीक व सामुहिक प्रयत्नांची गरज असते. असे प्रयत्न ज्यावेळा फलद्रुप होतात तेव्हा गरीबी हटू शकते. पण केवळ गरीबी हटाओ असे म्हणून गरीबी संपुष्टात येत नसते. हा प्रश्न संधी उपलब्ध होणे आणि संधीचा अभाव असणे, या दोन्हीमध्ये सतत रेंगाळत असतो. याचे बरे-वाईट परिणाम समाज अनुभवत असतो. यातूनच स्वस्ताई आणि महागाई अशा दोन व्यवस्था निर्माण झालेले आहेत. मोठ्या जिद्दीने परिस्थितीवर मात करणारी जी माणसे असतात. त्या माणसांचे निश्चय गरीबीला विराम देऊन पुढे जाण्याचे असतात. याकरिता शिक्षण हा एक मार्ग सतत सांगितला जातो. शिक्षण घेतल्याने माणसाची परिस्थिती बदलते ही गोष्ट जरी खरी असली तरी त्यासाठी गुणवत्ता पूर्ण शिक्षणाची जी गरज असते. त्याकरिता समाज म्हणून आपण कसे उभे राहतो. तेच महत्वाचे असते. अनेकवेळा जीवावर उदार होऊन साहस करणारी माणसे या साहसातून आपणास चार पैसे मिळतील हे गृहीत धरूनच ते करीत असतात. पण अशात एखाद्या निष्पापाचा जीव जाण्याची सुध्दा शक्यता असते. याकरिता शासनाच्या अनेक योजना असतातच. त्याचा उचित फायदा घेणाऱ्यांना गरीबीतून बाहेर पडण्याची संधीसुध्दा मिळणे महत्वाचे असते. शिक्षणाचे सर्व दरवाजे आज सर्वांच्याकरिता खुले आहेत. त्याबरोबरच हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या उपलब्ध आहेत. तसेच अनेक विश्वस्त संस्था आज गरीब विद्यार्थ्यांच्याकरिता त्यांच्या हिताचे अनेक उपक्रम करताना दिसून येत असतात. भारतातील थोरचित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय हे आपल्या देशातील गरीबीचे चित्रण करतात म्हणून नर्गिस या प्रसिध्द अभिनेत्रीने त्यांच्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली होती. जे आहे ते दिग्दर्शक सिनेमातून दाखवणार हे तर स्पष्टच आहे. आणि ते न दाखवल्यामुळे गरीबीचे वास्तव बदलेल, असेही नाही त्याकरिता सार्वत्रिक अथक परिश्रम महत्वाचे असतात. आणि ज्यांचा श्रमनिष्ठेवर विश्वास आहे. अशी मंडळी सहसा कुणावर विसंबूनही राहत नसतात. याकरिता आता कमी उत्पन्न गटाखालील लोकांच्यासाठी योजना राबवा पण फुकटेगीरीची घातक सवय मात्र राजकारण्यानी लावू नये, असे जरूर सुचवावेसे वाटते. आपल्याकडे लाडक्या लेकीसाठी पैसे देण्याची योजना आली पण कालांतराने अजित पवार यांनी याबद्दल जी नाराजी व्यक्त केली ती रास्तच आहे. उद्योगाचे घरी देवता लक्ष्मी वास करी असे म्हणतात. याचा अर्थ सर्वांच्याकरिता उद्योग उपलब्ध होणे हाही याचा दुसरा अर्थ असू शकतो. याकरिता ज्यांनी प्रत्यक्षात आठरा विश्वे दारिद्र्याचा विदारक अनुभव घेतलेला आहे. आणि त्यातून काही वर्षानी उत्तम समाजमान्य अशी लक्ष्मी निर्माण केली आहे. अशा लोकांचे अनुभव सतत समाजासमोर आले पाहिजे. केवळ गरीबीचा गहिवर व्यक्त करून फारसे काही साध्य होत नसते. त्यामुळे गरीबी ही सर्व समाजजीवनातून जर खरोखरज हद्दपार व्हावी, असे वाटत असते तर त्यासाठी तशा प्रयत्नांचीही गरज असते. फार पूर्वी दिलीपकुमार याने अभिनय केलेला 'नया दौर' नावाचा चित्रपट निघालेला होता आणि तो खूप गाजलेलाही होता त्यात कष्टातून समाज बदलतो आहे. याचे मोठ्या बारकाईने आणि कलात्मक पध्दतीने दर्शन घडविण्यात आले होते, असे अनेक चित्रपट प्रत्येक काळात निर्माण होतच असतात. पण केवळ चित्रपटामुळे गरीबी नष्ट झाली. असे होत नाही त्याकरिता 'यज्ञ तो देव जाणावा' हाच मंत्र सर्वानी समजून घेणे अगत्याचे आहे. याकरिता केवळ व्यक्तीश: माझी गरीबी कशी दूर होईल, असा आपल्या पुरता विचार करून चालणार नाही. तर माझ्याबरोबरच माझ्या आप्तेष्टांची, बांधवांची आणि सर्व समाजाची गरीबी कशी दूर होईल, याचा सतत विचार झाला पाहिजे, याकरिता अपंगांनासुध्दा समाजाने बळ दिले पाहिजे, मदतीचा हात देणे हे जसे महत्वाचे असते. तसे पांगळा माणूससुध्दा पर्वत चढून जाईल, असा आत्मविश्वास त्याच्या ठाई निर्माण करणे गरजेचे असते. याकरिता आपण समाज म्हणून किती झटतो यावरच हे सारे अवलंबून असते. म्हणून सवलत हवी पण सवलतीचे संधीत रूपांतर कसे होईल, हे पहावे लागेल, केवळ सवलतींचा वर्षाव करून तात्पुरते गरीबीबद्दलचे अभिप्राय जरूर समोर येतील, पण जे कष्टातून नवे विश्व उभे राहील ते मात्र प्रत्येकाला स्वबळाचा आनंद देणारे असेल, प्रत्येकजण जेव्हा अशा स्वबळासाठी सिध्द होईल तेव्हा गरीबीबद्दलचा गहिवर समोर येण्याचे कारण उरणार नाही.

**- प्रा. वैजनाथ महाजन**

# मुंबईत प्रदूषण निदर्शक सक्तीकडे कानाडोळा



## राजकारण

### हायकोर्टाने महापालिकेला फटकारले

मुंबईतील वायू प्रदूषणावर प्रभावी उपाय करण्यासाठी सर्व बांधकामांच्या ठिकाणांवर संबंधित विकासक कंपन्यांना धूळ प्रदूषण निदर्शक सेन्सर-आधारित उपकरणे लावणे बंधनकारक करून त्याची अंमलबजावणी करण्याचा आदेश मुंबई महापालिकेला देऊनही त्याचे पालन झाले नसल्याचे वदोन दिवसांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे आता न्यायालयाने महापालिकेला निर्वाणीचा आदेश देत, सहा आठवड्यांच्या आत त्या आदेशाची अंमलबजावणी करून १२ जूनपर्यंत कृती अहवाल देण्यास सांगितले आहे.

मुंबईसह मुंबई महानगर प्रदेशातील हवेची गुणवत्ता घसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने साधारण दोन वर्षांपूर्वी स्वप्रेरणेने (सुओ मोटो) दाखल करून घेतलेल्या जनहित याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे व न्या. मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठासमोर पुढील सुनावणी झाली. त्यावेळी बांधकामांच्या ठिकाणांवर प्रदूषण निदर्शक उपकरणे बसविण्याच्या आदेशाची अद्याप अंमलबजावणीच झाली नसल्याचे ज्येष्ठ वकील जनक द्वारकादास यांनी हस्तक्षेप अर्जदार 'वनशक्ती'तर्फे निदर्शनास आणले. 'अशी उपकरणे एक महिन्यात लावण्यास सांगा आणि त्या कालावधीत न लावल्यास संबंधित बांधकामांच्या ठिकाणांवर बांधकाम थांबवण्यासह अन्य कारवाई करा, असे निर्देश खंडपीठाने ९ जानेवारी, २०२५ रोजी दिले होते.



त्या आदेशाला तीन महिने उलटूनही मुंबई महापालिकेने पालन केल्याचे दिसत नाही', असे म्हणणेही द्वारकादास यांनी मांडले. तर 'बांधकामांच्या ठिकाणांवर उपकरणे लावण्यासह सर्व ठिकाणची माहिती एका ठिकाणी येऊन देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने केंद्रीभूत यंत्रणा विकसित करण्याकरिता आयआयटी मुंबई व आयआयटी कानपूर या संस्थांशी सल्लामसलत सुरू आहे. लवकरच ती प्रक्रिया पूर्ण होईल', अशी माहिती महापालिकेतर्फे ज्येष्ठ वकील मिलिंद साठे यांनी दिली. तेव्हा, '९ जानेवारीच्या आदेशाचे पालन करणे महापालिकेला बंधनकारक आहे. तरी आणखी एक संधी म्हणून सहा आठवडे देत आहोत. या कालावधीत अंमलबजावणी करून १२ जूनपर्यंत कृती अहवाल दाखल करावा', असे निर्देश खंडपीठाने महापालिकेला दिले.

### 'त्या' दोन ठिकाणांची तपासणी करा

'मुंबईतील चांदिवली येथील खैरानी रोड येथे भट्ट्यांमुळे तर उल्हासनगरमध्ये डम्पिंग केलेला कचरा जाळण्यामुळे सातत्याने वायु प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी आहेत', असे अटेंड खंबाटा यांनी निदर्शनास आणले. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी तपासणी करा आणि वायू प्रदूषण आढळल्यास तत्काळ प्रतिबंधात्मक उपाय करा, असे निर्देश खंडपीठाने एमपीसीबी'ला दिले.

'उद्योगांच्या ऑडिटचा संपूर्ण तपशील द्या'

'वायू प्रदूषणासाठी सर्वाधिक घातक असलेल्या लाल श्रेणीतील उद्योगांचे ऑडिट न्यायालयीन आदेशाप्रमाणे पूर्ण केल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) प्रतिज्ञापत्रात म्हटले असले तरी त्यातील निष्कर्षांची माहिती दिलेली नाही', असे सुनावणीत न्यायालयाला सहाय्य करणारे 'न्यायालय मित्र' ज्येष्ठ वकील दरायस खंबाटा यांनी निदर्शनास आणले. तर 'लाल श्रेणीतील उद्योगांच्या ऑडिटची सर्व माहिती सादर करू. तसेच पुढच्या टप्प्यातील नारंगी श्रेणीमधील उद्योगांचे ऑडिटही सुरू करू', अशी ग्वाही 'एमपीसीबी'तर्फे ज्येष्ठ वकील आशुतोष कुंभकोणी यांनी दिली. त्यानंतर १२ जूनपर्यंत तपशील देण्याचे निर्देश खंडपीठाने 'एमपीसीबी'लाही दिले.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८१ वैशाख शके संवत्- १९४७ संवत्सर विश्वावसूनाम अयन- उत्तरायण मास- वैशाख ऋतु- सौर वसंत शुक्ल पक्ष तिथि:चतुर्थी ११:२३:५४ नक्षत्र:मृगशिर्षा १४:२०:३७ योग:अतिगण्ड ०८:३३:५२ योग:सुकर्मा २९:३८:१३+ करण:विष्टि ११:२३:५४ करण:बव २२:१४:०२ सूर्य : मेष चन्द्र : मिथुन०३:१४:३९ हिजरी सन् - १४४५ मुस्लिम मास -जिल्काद तारीख - २ विशेष विनायक चतुर्थी महाराष्ट्र दिन मराठी राजभाषा दिन मे दिन आंतरराष्ट्रीय कामगार दिन

## राशी भविष्य...

**मेष** - अचानक धन मिळण्याची शक्यता आहे. व्यावसायिक वाद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येईल. अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. दुसऱ्याला दुखवू नका.

**वृषभ** - नोकरीमध्ये इच्छेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. आपल्या कामाचे कौतुक होईल. फुकटचा मोठेपणा टाळा.

**मिथून** - आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याचे योग आहेत. प्रतिष्ठीत व्यक्तिशी संबंध वाढतील. मुलांची प्रगती राहील. जोखमीचे काम आज करू नका.

**कर्क** - प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो. व्यापारात नवीन प्रस्ताव येतील. मुलांच्या कामाकडे लक्ष राहू द्या. सुखकारक प्रवास घडेल.

**सिंह** - योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे परंतु त्याच प्रमाणे उत्पन्न राहील. प्रत्येक क्षेत्रात मान सन्मान मिळेल. कोणतेही काम जबाबदारीने करा.

**कन्या** - विरोधकांवर मात केल्यामुळे आपल्या किर्तीत वाढ होईल. व्यापाराचे क्षेत्र विस्तृत होईल. जीवन साथीशी चांगले संबंध राहतील. आरोग्याची काळजी घ्या.

**तूळ** - व्यवसायात अनकुल असे यश मिळेल. कुटुंबामध्ये सुख व शांतीचे वातावरण लाभेल. कोणावरही अंध विश्वास बाळगू नका. आपल्या योजना कार्यान्वीत होतील.

**वृश्चिक** - कोणत्यातरी कामात मिळालेले यश आपल्यास फायदेशीर राहणार आहे. घराची अडचण दूर होईल. व्यापार, व्यवसाय चांगला चालेल. रागावर नियंत्रण हवे.

**धनू** - काम करण्याच्या पध्दतीत सुधारणा होईल. फायदेशीर व्यवहार राहतील. कौटुंबिक वातावरण चांगले राहिल. समाजात प्रतिष्ठा वाढेल. मशीन, वहान सावधपूर्वक हाताळा.

**मकर** - आपल्या आपक्षेप्रमाणे फळ मिळणार आहे. चैनीच्या वस्तू खरेदी करण्याचा योग आहे. जवळच्या व्यक्तीच्या आरोग्याची काळजी राहील.

**कुंभ** - कौटुंबिक वातावरण आनंदी राहील, कामामध्ये मन लागणार नाही. स्वाभिमान व अहंकार यामध्ये अंतर राखा. आर्थिक स्थिती बिकट राहील.

**मीन** - मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतिष्ठा कमी होईल. आखलेल्या योजना पूर्ण होणार नाही. प्रवास त्रासदायक राहील.

## पारावरचा फड



अगोदरच दिवाळखोरीच्या वाटेवर आणि भिकेकंगाल झालेल्या पाकिस्तानची अवस्था सुंभ जळला तरी पिळ जात नाही अशीच आहे. वास्तविक लोकांना खायला अन्न नाही. बेकारीने हैराण जनता रस्त्यावर उतरत आहे. अण्वस्त्रे असो वा सर्वच जीवनावश्यक सुविधा जगापुढे हात पसरल्याशिवाय पाकिस्तानला गत्यंतर नाही. सगळ्यांकडे मदतीसाठी याचना करण्याची वर्षानुवर्षांची परंपरा कायम आहे. असे असूनही विधायकऐवजी विघातकच बुद्धीने दहशतवाद पोसायचे आणि भारतात दहशतवादी घुसवण्यासाठी साम-दाम खर्ची घालत कुरघोड्यांचा सपाटा सुरूच आहे. काश्मीरच्या पहलगाममध्ये अशाच पद्धतीने २८ पर्यटकांना मारल्याने भारताने पाकची पाणीबाणीसह सर्व प्रकारे कोंडी सुरुवात केली आहे. त्यामुळे तहान-भूकमारीची वेळ असताना राजकारणी भारताला संपविण्याची आणि रक्ताचे पाट वाहण्याची भाषा करीत आहेत. पंजाब प्रांताच्या मुख्यमंत्री मरियम नवाज यांनी तर अणुबॉम्ब असल्याने आमच्या नादाला कोण लागणार नाही, अशी अक्कलहुशारीची वल्गना सुरू केली आहे. एकूणच यासंदर्भात पारावरची चर्चा...!

**पांडूनाना :** त्या पाकड्यांस्नी आक्कल बिक्कल हाय की न्हाय? आरं आपन कुनाच्या नादाला लागतुया?

**बाबूराव :** घरात खाय न्हाय दाना आन् मला आन्ना म्हना... करजबाजारी, भूकमारी, बेकारीनं पाकीस्तान गांजलाया. आसं आसताना जनतेला सोडून त्या दहशतवाद्यास्नी खाय प्याय घालत्याती. त्यास्नी हात्यारं आन् पैकं पुरवून भारतावं हाल्लं करत्याती.

**पांडुनाना :** बग न्हवं, त्या पहलगाममदी हाल्ला करून नाहक मारलं पर्यटकास्नी. आता भारतानं त्यांचं पानी आन् समदं मदत रोकायचं काम केलं. सोबतच जगभरातनं त्यांना कोंडी केलीया.

**बाबूराव :** व्हय, पन त्यातनं शानी हुत्याल ती पाकडी कसली? दहशतवादी आन् राजाकरनी म्हंत्यात पानी रोकाल तर रगताचं पाट वाहू, भारतावं आणुबॉम्ब टाकू.

**पांडूनाना :** खराय, ते सनी देवोलच्या पिक्चरात म्हटलं न्हाय का, 'बरसात से बचने की हायशीयत न्हाय आन् गोलीबारी आन् आनुबॉम्बची भाषा करत्यात...!

**बाबूराव :** आरं . ती नवाज शरीफची लाडकी लेक म्हंत्या, आमच्या नादाला लागला तर आनुबॉम्ब टाकू.

**पांडूनाना :** तिला आक्कल हाय का न्हाय. आनुबॉम्ब चालवायची आक्कल सोडच. तिथं फुटला बिटला बॉम्ब तर बेचिराक हुत्याल. जपानचं काय झालं बगा म्हनावं.

**बाबूराव :** ते जावू द्या, राजकारन्यास्नी वैतागून तिथलं लष्कराचं आदिकारी आन् सैनिक बी नोकऱ्या सोडून पळ काडाय लागल्याती.

**पांडूनाना :** मग हे राजकारनी बंदुका घिऊन उतरत्याल का?

**बाबूराव :** ते कुटलं, आपल्या पोरा-बाळास्नी सोडून पळ काडत्याल देशाला वाऱ्यावं सोडून! **- अमृत चौगुले**

## उपदेश कथा



### शोधक नजर

स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर चक्रवर्ती राजगोपालाचारी (राजाजी) कलकत्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयास भेट देण्यासाठी आले होते. ग्रंथालयाच्या दर्शनी कक्षात थोर भारतीय स्त्री-पुरुषांच्या तसबिरी भिंतीवर लावलेल्या आहेत. राजाजी त्यांच्या शोधक नजरेने ग्रंथालय पाहात होते. कुणा जवळच्या माणसाने त्यांच्या तसबिरीकडे बोट दाखविलं, ते थंडपणे म्हणाले, 'आज सकाळीच तर नाही टांगली ती तसबीर?' तल्लख बुद्धिमत्तेचे वरदान लाभलेले ते वयोवृध्द मुत्सद्दी होते. टाचणीनं फुगा फोडावा, तसा त्यांनी विभूतिपूजक दुनियेचा पोकळ बडिवार तर उघड केलाच पण रामायण-महाभारताचे जनसामान्यांसाठी सुगम अनुवाद करणाऱ्या आपल्या अंत:करणातली विरक्ती किती सच्ची आहे याचाही प्रत्यय दिला.

**कथा उपदेश : बुध्दिमता आणि अनुभवाने कोणताही पोकळ बडिवार फोडता येतो.**

## दिनविशेष...



### आंतरराष्ट्रीय

१०४५ - ग्रेगोरी सहावा पोपपदी.

१३२८ - एडिनबर्ग-नॉर्थहॅम्पटनचा तह - इंग्लंडने स्कॉटलंडला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता दिली.

१७०७ - ॲक्ट ऑफ युनियन - इंग्लंड व स्कॉटलंडने एकत्र येउन ग्रेट ब्रिटन या राष्ट्राची निर्मिती.

१८३४ - इंग्लंडच्या वसाहतीतून गुलामगिरीची प्रथा कायदेबाह्य ठरवण्यात आली.

१८६३ - अमेरिकन गृहयुद्ध-चान्सेलरव्हिलची लढाई.

१८८६ - या दिवशी अमेरिकेत आठ तासाचे काम हे एक दिवसाचे काम असे प्रमाणित करण्यासाठी संप सुरू झाला. हा दिवस जगभर (अमेरिका सोडून) कामगार दिन म्हणून पाळला जातो.

१८९८ - मनिला बेची लढाई - अमेरिकेच्या आरमाराने स्पेनची जहाजे बुडवली.

१९०० - अमेरिकेत स्कोफील्ड येथील खाणीत अपघात. २०० ठार.

१९३० - सूर्यमालेतील नवव्या ग्रहाचे प्लुटो असे नामकरण करण्यात आले.

१९३१ - न्यूयॉर्क शहरातील एम्पायर स्टेट बिल्डींग खुली.

१९४१ - दुसरे महायुध्द - जर्मनीच्या सैन्याने लिब्यातील टोब्रुक शहरावर कडाडून हल्ला चढवला.

## जन की बात...



### कुटिल रणनिती मोडीत काढायला हवी

पहलगाम येथील पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यानंतर देशभर संताप आणि चीड व्यक्त होत आहे. हा हल्ला ज्या निर्घृणपणे करण्यात आला आहे त्यामुळे चीड आणि संताप निर्माण होणे साहजिकच आहे मात्र हा संताप व्यक्त करताना काही जणांनी थेट देशातील अल्पसंख्यांक समाजाला लक्ष करण्यास सुरुवात केली आहे. अतिरेक्यांनी धर्म विचारून हल्ला केल्याने देशातील हिंदूंनीही दुकानातून खरेदी करताना दुकानदाराला धर्म विचारून खरेदी करावी. अल्पसंख्यांक समाजाच्या दुकानातून खरेदी करू नये. अल्पसंख्यांक समाज हा देशद्रोही असून त्यांच्यावर बहिष्कार घाला असा टोकाचा विचार काहीजण समाज माध्यमात व्यक्त करत आहे. असा विचार करणाऱ्यांनी आधी या हल्ल्यायामागची पाकिस्तानची रणनीती समजून घ्यायला हवी. अतिरेक्यांकडून थेट हिंदूंना लक्ष करण्यामागे कुठेतरी त्यांच्या डोक्यात हे गणित आहे की जर हिंदूंवर हल्ला केला तर भारतातील हिंदू संतापून आपल्याच देशातील अल्पसंख्यांक समाजावर सूड उगवण्यास प्रवृत्त होतील.भारतातील बहुसंख्यांक हिंदू संताप आणि नैराश्यातून अल्पसंख्यांकावर तुटून पडतील परिणामी दोन्ही समाजात दंगली होऊन भारतात गृहयुध्द पेटले. पाकिस्तानची ही रणनीती यशस्वी न होऊ देण्याची जबाबदारी दोन्ही समाजाची आहे. दोन्ही समाजाने सामंज्यसाने राहून पाकिस्तानची ही कुटील रणनीती मोडीत काढायला हवी.

**वैशाली कांबळे, सांगली**

### कामगारांच्या हक्काचा दिवस कामगार दिन

१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा करण्यात येतो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या : कायद्याने आठ तासांचा दिवस, लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी, महिला कामगारांच्या कामावर मर्यादा, रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम, कायद्याने साप्ताहिक सुट्टी, कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा, समान कामासाठी समान वेतन या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बाँब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. त्यावेळेपासून १ मे हा जागतिक कामगार दिन जगभरात उत्साहात साजरा केला जातो.

**-रेणुका ठाणेदार, पुणे**

### पेय पदार्थांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

शहरातील रस्त्या-रस्त्यावर लिंबू सरबत, बर्फाचा गोळा विकणाऱ्या हातगाड्या उभ्या असतात. उन्हाळा सुरू असल्याने तहान भागवण्यासाठी नागरिक या हातगाड्यांवरील सरबत आणि बर्फगोळा विकत घेतात. त्यामुळे शरीरास तात्पुरता थंडावा जरी मिळत असला तरी ते शरीरास बाधक असते. सरबत तयार करताना वापरात येणारे पाणी व बर्फ याबाबतीत कोणतीही दक्षता विक्रेत्यांकडून घेतली जात नाही. त्यामुळे अस्वच्छ पाणी व दूषित बर्फामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे. अन्न व औषध प्रशासनाने आणि महानगर पालिकेने रस्त्यांवरील सरबत व बर्फाचे गोळे विकणाऱ्या हाताागाड्यांवरील पेय पदार्थांबाबत योग्य निर्णय घ्यावा. काही दिवसांपूर्वी कोल्हापुरातील छत्रपती प्रमिला राजे म्हणजेच सीपीआर रुग्णालयाच्या आवारात मृतदेहासाठी वापरून नंतर टाकून दिलेला बर्फ पाणी थंड करण्यासाठी वापरला जात असल्याचा व्हिडिओ समोर आला. हेच थंड पाणी नंतर सरबतासाठी वापरले जात असल्याचे समोर आले. मृतदेहासाठी वापरलेला बर्फ सरबतासाठी वापरणे म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी खेळणे. अन्न व औषध प्रशासनाने तसेच महानगरपालिकेने बर्फाचे गोळे व सरबत विकणाऱ्या हातगाड्यांची तपासणी करावी आणि अस्वच्छ पाणी आणि दूषित बर्फ वापरणाऱ्या हातगाड्यांवर कारवाई करावी.

**-अनुराधा कुलकर्णी, कोल्हापूर**

## जांबूत येथे घरफोडी; झोपेत असलेल्या महिलेच्या अंगावरील दागिने लंपास




■ जनप्रवास प्रतिनिधी

जांबूत : जांबूत ता. शिरूर दि २९ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास जांबूत येथील थोरात वस्तीमध्ये दोन अज्ञात चोरट्यांनी एका महिलेच्या घरात घुसून जबरदस्तीने तिच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने लंपास केले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत हिराबाई लक्ष्मण थोरात वय ५२ यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महिला रात्री झोपेत असताना दोन अज्ञात इसमांनी खिडकी उचकटून घरात प्रवेश केला. त्यातील एकाने त्यांच्या गळ्यातील डोरले हिसकावून घेतले, तर दुसऱ्याने कानातील सोन्याच्या कुड्या जबरदस्तीने काढून नेल्या. डाव्या कानातील कुडी ओढताना त्यांच्या कानाला जखम झाली आहे. शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण करत असून, पुढील तपास सुरु आहे.

# नागरिकांच्या सहकार्यातून रस्त्यात अडथळा ठरणाऱ्या लालटाकी येथील मंदिरांचे स्थलांतर

## पत्रकार चौक ते नेप्ती नाका चौक रस्त्याचे ८० टक्के काम पूर्ण

### महिनाभरात संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी खुला होणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : मध्यवर्ती शहर व सावेडी उपनगर परिसराला जोडणारा व वाहतुकीचा प्रमुख रस्ता असलेल्या पत्रकार चौक ते नेप्ती नाका चौक रस्त्याचे काम ८० टक्के झाले आहे. रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारे लालटाकी येथील वैष्णव मातेचे मंदीर नागरिकांच्या सहकार्यातून स्थलांतरित करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालय व वारुळाचा मारुती परिसर येथील मंदिरेही स्थलांतरित केली जाणार आहेत. त्यामुळे येत्या महिनाभरात उर्वरित कामे पूर्ण होऊन संपूर्ण रस्ता नागरिकांना वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सर्व रस्त्याचा कामाचा आढावा घेतला. शहरातील सर्वाधिक रहदारी पत्रकार चौक ते नेप्ती नाका चौक रस्ता लवकरात लवकर खुला करण्यासाठी नियोजन करून उर्वरित कामे पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिल्या. या रस्त्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी १६.२९ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. लालटाकी येथील श्री वैष्णव माता मंदिर नागरिक व मंदिराच्या विश्वस्तांच्या सहकार्याने स्थलांतरित केले आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होणार नाही. सदरचा रस्ता २४ फूट रुंद आहे. कॉंक्रीटीकरण झाल्याने वाहनांचा वेगही वाढणार आहे. अशा स्थितीत रस्त्यात मंदिर तसेच राहिले तर एखादी दुर्घटना होऊन मंदिराचे पावित्र्य धोक्यात आले असते. त्यामुळे नागरिक व विश्वस्तांशी चर्चा केली व त्यांच्या सहकार्यामुळे मंदिर स्थलांतरित केले. वारुळाचा मारुती कमान व नेप्ती नाका चौक येथे असलेले सुशोभीकरण रस्त्यास अडथळा ठरत असल्याने हटवण्यात आले आहे. आता वारुळाचा मारुती कमान येथील मुंजोबा मंदिर व जिल्हा रुग्णालय येथील महालक्ष्मी मंदिर तेथील नागरिकांच्या सहकार्याने स्थलांतरित करण्यात येणार आहे, असे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले. सुमारे १७०० मीटर लांबी व २४ मीटर रुंदी असलेल्या या रस्त्याच्या कामामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे होणारा त्रास टळणार आहे. या रस्त्याचे ८०% काम पूर्ण झालेले आहे. येत्या महिनाभरात संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच, अप्पू चौकात खाजगीकरणाच्या माध्यमातून नव्याने चौक सुशोभीकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे, असेही आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.



## पाकिस्तान मुर्दाबाद च्या नाऱ्याने पाषाण परिसर दुमदुमला

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : पुण्यातील पाषाण येथील सुतारवाडी भागातील साई चौक येथे पाकिस्तान मुर्दाबाद दहशतवादाविरुद्ध घोषणाबाजी केली आणि पहलगाम घटनेत शहीद झालेल्यांना श्रद्धांजली वाहिली.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाव येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वसईत पुण्यातील पाषाण भागातील युवकांनी तीव्र निषेध व्यक्त केला. या हल्ल्यात भारतीय नागरिकांचे मोठे नुकसान झाल्याने संतप्त युवकांनी पाकिस्तानविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून जाहीर निषेध नोंदवला. सुतारवाडी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात युवक, युवती,कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी 'पाकिस्तान मुर्दाबाद', 'दहशतवादाचा नाश होवो', अशा घोषणा देत देशविरोधी कारवायांना कठोर प्रत्युत्तर देण्याची मागणी केली. पाकिस्तानला याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. देशात राहून देशाविरोधात षड्यंत्र रचणार्या काही राजकीय टोळ्यांचा प्रथम बंदोबस्त करणे गरजेचे असल्याची भूमिका जमलेले युवकांनी यावेळी व्यक्त केली.



शुभम अनंता सुतार पुणे शहर चिटणीस युवा सेना,अक्षय बाबासाहेब सुतार कोथरूड विधानसभा अध्यक्ष युवा सेना,गणेश सुनिल विचारे -उपाध्यक्ष युवा मोर्चा कोथरूड मतधार संघ,धर्मराज येळेगार शाखा प्रमुख सुतारवाडी, बाळासाहेब दांडेकर,साहिल शेख,चेतन सुतार संदीप तुपे ज्ञानेश्वर भोईने गौरव मानवतकर सुमित शिरसागर आंदोलनात सहभागी झाले होते.

## तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न; नागरिक उन्हामुळे तहान लागून हैराण

### प्रशासनाचे दुर्लक्ष; मुलभूत सुविधांची वानवा

जनप्रवास: प्रतिनिधी

जांबूत: शिरूर तहसील कार्यालय हा नागरिकांच्या विविध कामांसाठी नियमितपणे भेट दिला जाणारा शासकीय विभाग असूनदेखील, तेथील मुलभूत सुविधांचा अभाव नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. विशेषतः पिण्याच्या पाण्याच्या अत्यावश्यक सुविधेचा अभाव हा गंभीर प्रश्न बनला असून, त्याकडे प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे.

सध्या उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. ३८-४० अंश सेल्सिअसपर्यंत तापमान पोहोचत असताना,शिरूर तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक ठिकाणी पाण्याचे फिल्टर बसवलेले असले तरी, ते बंद अवस्थेत आहेत. या फिल्टरवर धूळ साचलेली असून, साफसफाईचा अभाव स्पष्टपणे जाणवतो.

खर्च करून पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. स्वत:च्या कामासाठी येणाऱ्या नागरिकांना तहसील कार्यालयात तासनतास थांबावे लागते.

या काळात पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्यामुळे अनेकांना जवळच्या दुकानांतून पाणी विकत घेण्याची वेळ येते. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, वृद्ध आणि महिलांना याचा विशेष फटका बसतो आहे. ''शासकीय कार्यालयात पिण्याचे पाणीसुद्धा मिळू नये, ही दुर्दैवाची गोष्ट आहे,'' असे मत काही नागरिकांनी व्यक्त केले.




काही ठिकाणी तुटलेल्या खुर्च्या, काही ठिकाणी अस्वच्छ परिसर पाण्याच्या प्रश्नासोबतच तहसील कार्यालय परिसरातील बसण्याच्या खुर्च्याही खराब अवस्थेत असून, काही ठिकाणी त्या तुटलेल्या अवस्थेत दिसतात.

स्वच्छतागृहांची देखील दुरवस्था झालेली आहे. काही परिसर अस्वच्छ असून, नियमित स्वच्छतेचा अभाव स्पष्टपणे दिसतो. त्यामुळे नागरिकांत नाराजीचे वातावरण आहे.

नागरिकांची प्रशासनाकडे मागणी या परिस्थितीविषयी बोलताना स्थानिक नागरिकांनी सांगितले की, ''तहसील कार्यालय हे शासकीय कामकाजाचे केंद्र असून, येथे हजारो लोक रोज येतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधा असाव्यात, ही केवळ अपेक्षा नसून गरज आहे.''

याबाबत तहसील कार्यालय प्रशासनाने तातडीने पावले उचलावी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत करावी, तसेच स्वच्छतेच्या दृष्टीने योग्य उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## शिवसेनेच्या उपजिल्हाप्रमुख पदी माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे यांची नियुक्ती

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विश्वासास पात्र राहणार : मनोहर पोटे

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : शिवसेनेच्या उप जिल्हा प्रमुख पदी माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे यांची नियुक्ती करण्यात आली नियुक्तीचे पत्र राज्याचे परिवहन मंत्री ना.प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते मुंबई येथे मनोहर पोटे यांना दिले.

जानेवारी महिन्यात माजी नगराध्यक्ष यांनी कॉंग्रेस पक्ष सोडून राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला होता.

मनोहर पोटे यांनी २०१६ ते २०१८ या अडीच वर्षात नगराध्यक्ष पदाच्या माध्यमातून कामाचा ठसा उमटवला पुढे नागरिकांतून नगराध्यक्ष निवडीत त्यांच्या पत्नी सौ.शुभांगी ताई पोटे विजयी झाल्या त्यांचा कार्यकाळ २०२४ मध्ये संपला मात्र पुढे निवडणुका झाल्या नाहीत या पार्श्वभूमीवर आगामी नगरपालिका,जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीत पक्षाला यश मिळण्यासाठी मनोहर पोटे यांची उप जिल्हा प्रमुख पदी नियुक्ती केल्याचे राजकीय वर्तुळात चर्चिले जात असून नियुक्ती नंतर बोलताना मनोहर पोटे म्हणाले पक्ष मुख्य नेते राज्याचे उप मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांनी आपल्यावर जो विश्वास दाखवला त्यास पात्र राहून जिल्ह्यात शिवसेना पक्ष बळकट करण्यासाठी तसेच ना.एकनाथ शिंदे यांच्या वेगाने काम हातावेगळे करून जनसामान्यांना न्याय दिला याचा प्रचार करून तळागाळात शिवसेना विचार रुजवू तसेच पक्षाला यश मिळवून देण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले.



यावेळी नियुक्ती पत्र देताना शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल शिंदे,जिल्हा संपर्क प्रमुख सचिन जाधव मा. जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले ,श्रीगोंदा तालुका प्रमुख नंदकुमार ताडे आदी सह पदाधिकारी उपस्थित होते.

मनोहर पोटे यांची नियुक्ती झाल्या बद्दल जिल्हा प्रमुख अनिल शिंदे, जिल्हा संपर्क प्रमुख सचिन जाधव श्रीगोंदा तालुका प्रमुख नंदकुमार ताडे आदींनी अभिनंदन केले आहे.

## पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून पहेलगाम घटनेचा महाकाल ग्रुप तर्फे निषेध

### भारत सरकारने इस्लामिक दहशतवादाची पाळीमुळे नष्ट करा : सुमीत धेंड

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : चितळे रोड येथे महाकाल ग्रुप, हिंदूराष्ट्र सेना, श्रीराम नवमी उत्सव समिती तर्फे पाकिस्तानी अतिरेक्यांनी पहेलगाम येथे केलेल्या भ्याड हल्लाचा निषेध केला.यावेळी चितळे रोड येथे पाकिस्तानचा झेंडा रस्त्यावर चिकटवण्यात आला.तसेच पाकिस्तानी झेंडा पायदळी तुडवून पाकिस्तान मुर्दाबाद... पाकिस्तान मुर्दाबाद....अशा घोषणा देत इस्लामी दहशतवादाचा निषेध करण्यात आला.याप्रसंगी सुमित धेंड, सचिन पळशीकर, विशाल बोल्ली, प्रतीक बोगावत, गणेश झिंजे, रवी दंडी, शशिकांत देशमुख, अतुल चित्तरंजन,



स्वामी बिडकर, परेश खराडे विशाल ठाकूर, अक्षय वलाकट्टी, स्वप्नील खोडदे, महेश राऊत, किशोर वडझिरकर, यश सब्बन, यश आडेप, नील दुस्सा, स्वराज बोरा, प्रणव बोज्जा, तेजस आडेप, श्रेयस धेंड, सोहम धेंड, ब्रिजेश श्रीराम, नानू इगे, प्रथमेश सामल, रुद्राक्षी पळशीकर, हंबल एडके, अभिषेक भालेराव, योगेश ज्ञालपेल्ली आदींसह हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धर्मांध जिहादी प्रवृत्तीला भारत सरकारने ठेचून काढावे. निष्पाप पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या आतंकवाद्यांना शोधून त्यांना तात्काळ फाशीच शिक्षा द्यावी.अशी मागणी महाकाल ग्रुपच्या वतीने करण्यात आली.यावेळी भारतमाता की जय...., जय श्रीराम अशा घोषणा दिल्या.सुरुवातीला दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या हिंदू बांधवांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## सेनापती बापटच्या ठेवीदारांची अखेर कोर्टात धाव....!

### पारनेर न्यायालयात फिर्याद दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : तालुक्यातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या सेनापती बापट पतसंस्थेच्या ठेवीदारांनी संचालक मंडळा विरुद्ध विश्वासघात व फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी पारनेर न्यायालयात धाव घेतली आहे. सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेकडे ठेवीदारांचे २५० कोटी रुपये अडकले आहेत. गेल्या वर्षभरापासुन या संस्थेचे कामकाज ठप्प आहे. कोणतीही वसुली नाही. ठेवीदारांनी अनेक वेळा बैठका घेतल्या, आंदोलनाचा इशारा दिला. परंतु संस्थेने दखल घेतली नाही. तालुक्याचे माजी आमदार यांनी या संस्थेची स्थापणा पस्तीस वर्षापुर्वी केली होती. हि पारनेर तालुक्यातील पहिलीच सहकारी पतपेढी होती. औटी यांच्या अधिपत्या खाली चालु असलेल्या या संस्थेवर गुंतवणुदारांचा मोठा भरोसा होता. परंतु औटी काही वर्षापुर्वी संस्थेतुन बाहेर पडल्याची ठेवीदारांना माहीती नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात ठेवीदारांनी गुंतवणुक केली. संस्थेचे अध्यक्ष रामदास भोसले संस्था भक्कम स्थितीत असल्याची खोटी माहीती देवून ठेवीदारांना वर्षभरापासुन फसवत आहेत.

प्रथम मुख्यालयच विकले....!

ऑक्टोबर २०२४ मध्ये ठेवीदारांचा मेळावा घेण्याचा बहाणा करून त्या बैठकीला विषेश सभा दाखवून संस्थेचे पारनेर येथील कोट्यावधी रकमेचे मोक्याचे ठिकाणी असलेले मुख्यालय विक्रीचा बनावट ठराव घेतल्याये दाखविण्यात आले. अशा रितीने संस्थेचे मुख्यालयच प्रथम विक्री केले आहे. व्यवस्थापक मंडळाने त्यातुन आलेल्या रकमा कोणत्याही ठेवीदाराला दिल्या नाहीत. विक्री केलेले मुख्यालय सध्या पुर्ण बंद असुन संस्थेचे संचालक संपर्क बंद करून फरार आहेत. ठेवीदारांना संपर्क करण्याचे कुठेही ठिकाण ठेवले नाही. सर्व शाखांना टाळे आहे. संस्थेचे संस्थापक मा. आमदार विजय औटी यांनीही सध्या आपला या संस्थेशी काहीही संबंध नाही असे म्हणत हात वर केले आहेत.



त्यामुळे, जवळे येथील एका ठेवीदाराने संस्थेच्या संचालक मंडळाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारा फौजदारी खटला पारनेर प्रथम वर्ग न्यायालयात दाखल केला आहे. सदर प्रकरणी इतर ठेवीदारांनीही पारनेर पोलिस व न्यायालयाकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी केलेली आहे. ठेवादारांनी पारनेर पोलिस निरीक्षकांना काल दि. २९ रोजी निवेदन दिलेले आहे.

महाराष्ट्रदिन व कामगारदिनाच्या हार्दिक शुभेच्छा

Somaiya GROUP

GODAVARI BIOREFINERIES LTD.

We are a Biorefining company producing sugar, chemicals and waxes

- Industrial Grade sugar
- Rectified Sprit
- Acetic Acid
- Sorbic Acid
- 1,3 Butylene glycol
- Ethyl Lactate
- Project uner development
- Pharma Grade Sugar
- Perfumery Grade Alcohol
- Ethyl Acetate
- 3-Methyl-1 Penten-2-one
- Triethoxy Butanc
- Pharma Grade Alcohol
- Crotonaldelryde Diurea
- Extra Neutral Alcohol
- Acetalehyde
- Crotonaldehyde
- Paraldehyde
- Crotononitrile
- Nautrowax

Register Office
Somaiya Bhawan, 45-47, MG Road, Post box no. 384, Fort, Mumbai-400023 Ph. no.022-22048272&, 22858430

Factory
1. Po, Sakarwadi-423, Tal-Kopargaon, Dist-Ahmednagar (M.S.)
2. Sameerwadi (via Mahalingpur), Dist. Bagalkot, Karnataka

# वाघोलीत किडी लँडस प्री-स्कूलचे उद्घाटन गोगावले व गोऱ्हे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले

## अतिरेक्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल : मंत्री भरत गोगावले

■ जनप्रवास प्रतिनिधी

लोणीकंद : जम्मू-काश्मीरमधील अतिरेक्यांच्या हल्ल्याला जशास तसे उत्तर दिले जाईल. देशाच्या सुरक्षेच्या बाबतीत कुठलीही तडजोड होणार नाही, असा ठाम इशारा राज्याचे मंत्री भरत गोगावले यांनी दिला. ते उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यासोबत वाघोली दौऱ्यावर असताना प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

या दौऱ्यात किडी लँडस प्री-स्कूलचे उद्घाटन गोगावले व गोऱ्हे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. त्यानंतर त्यांनी वाघेश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. देवाने आतापर्यंत अनेक इच्छा पूर्ण केल्या आहेत, आता पालकमंत्री पदाचीही पूर्तता होईल अशी अपेक्षा आहे, असे सूचक वक्तव्य करत गोगावले यांनी राजकीय इच्छेचा संकेत दिला.

मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री जो निर्णय घेतील, तो आम्ही मान्य करू. शिंदे-फडणवीस यांच्यात कोणतेही मतभेद नाहीत; वेळोवेळी काही निर्णय दुरुस्त करावे लागतात, इतकेच, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी देखील वाघोलीच्या वाघेश्वर मंदिरात दर्शन घेतल्यावर भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केली. माझे वडील दिवाकर गोऱ्हे यांनी या भागात



कार्य केले, ही त्यांची कर्मभूमी आहे. येथे आल्यानंतर जुन्या आठवणी जाग्या झाल्या, असे त्या म्हणाल्या.

तसेच, बागेत मुलांसाठी झोके, सी-सॉ, बाक यांसारखी खेळणी आणि महिलांसाठी चालण्याच्या व खेळण्याच्या सुविधा निर्माण करण्यासाठी आमदार निधीतून पाच लाख रुपये देण्याची घोषणा त्यांनी केली.

या कार्यक्रमाला माजी जि.प. सदस्य रामभाऊ दाभाडे, शिवसेना शहराध्यक्ष प्रमोद भानगिरे, तेजस्विनी महिला संस्थेच्या अध्यक्षा सारिका पवार, जिल्हा प्रमुख उल्हास तुपे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री गोगावले व उपसभापती गोऱ्हे यांच्या माध्यमातून वाघोलीच्या विकासाला गती मिळेल. त्यांचे मार्गदर्शन व मदत वाघोलीसाठी नेहमीच लाभदायक ठरेल, असे मत रामभाऊ दाभाडे यांनी व्यक्त केले.

वाघोलीत या दौऱ्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिकांनी मंत्र्यांचे जल्लोषात स्वागत करत कृतज्ञता व्यक्त केली

# संक्षीप्त वृत्त

## करडे गावात विहिरीत पडून ३१ वर्षीय तरुणाचा मृत्यू

■ जनप्रवास : प्रतिनिधी

जांबूत : करडे ता. शिरूर येथील ३१ वर्षीय पवन अशोक बांदल या तरुणाचा विहीरीत पाण्यात पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सकाळी ९.३० च्या सुमारास पवन बांदल आपल्या शेतातील विहीरीवरील मोटार चालू करण्यासाठी निघाला होता. दुपारी पाणी न आल्यामुळे त्याचा भाऊ श्रीनिवास बांदल शेतात गेला असता, पवनची मोटारसायकल व कामाचे साहित्य विहिरीजवळ आढळले. त्याने विहिरीत पाहिले असता पवन विहिरीत पाण्यावर तरंगताना दिसला. पवनला पोहता न येत असल्याने मोटार चालू करताना पाय घसरून तो विहीरीत पडला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. तातडीने शेजारी व पोलीसांच्या मदतीने पवनला विहिरीतून बाहेर काढण्यात आले व न्हावरा ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार भोते करत आहेत.

## राष्ट्संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार जिल्हा हमाल पंचायत चे अध्यक्ष अविनाश घुले यांना जाहीर



■ जनप्रवास प्रतिनिधी

नगर : नेवासा तालुक्यातील गोंडेगाव जनकल्याण फाऊंडेशन च्या सन २०२५ चे राष्ट्संत तुकडोजी महाराज आदर्श समाजभूषण पुरस्कारसाठी अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायत चे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती फाउंडेशन चे अध्यक्ष पांडुरंग रोडगे यांनी दिली .पुरस्कार वितरण सोहळा बुधवार दि ३०-०४-२०२५ रोजी साय ६ वाजता आमदार विठ्ठलराव लंघे यांच्याहस्ते गोंडेगावं येथे होणार असल्याचे सचिव सुरेश रोडगे व रामदास नजन यांनी सांगितले

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव सुद्धा करण्यात येणार आहे अविनाश घुले यांचे जिल्हा हमाल पंचायत च्या माध्यमातून संपूर्ण जिल्हाभर काम सुरु असून डॉ बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनानुसार राज्याच्या कार्यकारणीवर सुद्धा ते काम पाहतात तसेच अहिल्यानगर येथे सर्व कामगार संघटनांचे अध्यक्ष म्हणून सुद्धा त्यांचे काम सुरु आहे . रिक्षा पंचायत ,वेगवेगळ्या कामगार संघटना आदी च्या माध्यमातून त्यांनी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी विविध आंदोलने केली आहेत या त्यांच्या कामाची दखल घेऊनच त्यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे .पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे .

## आरोग्य ग्राम जखणगांव येथे एकात्म अभियान अंतर्गत योग शिबीरास सुरुवात



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : नगर तालुक्यातील आरोग्य ग्राम म्हणून राज्यात ओळख असणाऱ्या जखणगांव येथील प्राथमिक शाळेत ग्रामपंचायत जखणगांव व हार्ट फुलनेस समितीच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने ध्यान योग शिबीर आयोजित करण्यात आले आहे. आज सकाळी गावचे सरपंच डॉ सुनिल गंधे यांचे हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

शिबिरामध्ये तज्ञ योग शिक्षक डॉ मंदार भणगे,सौ रिना खरमाळे , श्रीमती उषा पित्रे जोशी ,सुनिल बल्लाळ यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक बाळासाहेब वाबळे, अर्चना शेळके, निर्गुणा कापसे,भामाबाई कर्डिले,संगीता दुधाडे यांच्या सह अनेक ग्रामस्थ, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

योगाकडुन आरोग्याकडे व आरोग्याकडुन समृद्धी कडे या उद्देशाने जखणगांव मध्ये सुरू करण्यात आलेल्या या ध्यान शिबीराचा लाभ जखणगांव सह पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांनी घ्यावा असे आवाहन डॉ सुनिल गंधे यांनी उद्घाटन प्रसंगी केले.

## राहुरी तालुक्यातील सडे परिसरात अल्पवयीन मुलीचे अपहरण

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी तालुक्यातील सडे परिसरात एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची घटना उघडकीस आली. या घटने बाबत अज्ञात इसमा विरोधात अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला.



राहुरी तालुक्यातील सडे परिसरात १६ वर्षे ४ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी तीच्या कुटुंबासह राहते. दि. २५ एप्रिल २०२५ रोजी रात्री ११ वाजे पासून पिडीत मुलगी बेपत्ता झाली. दि. २६ एप्रिल रोजी सदर घटना उघडकीस आली. नातेवाईकांनी तीचा परिसरात शोध घेतला. मात्र ती कोठेही आढळून आली नाही. आपल्या मुलीला कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी अमिष दाखवून अज्ञात कारणासाठी पळून नेले. अशी नातेवाईकांची खात्री झाली. गौतम बाळासाहेब निकम, रा. पिंपळगाव माळवी, ता. जि. अहिल्यानगर यांचेवर नातेवाईकांचा संशय आहे. पिडीत मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. ४९८/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

## स्वाती वेलनेस सेंटरने वन्यजीवांची तहान भागवली

### पारनेर तालुका पत्रकार संघ व जागतिक आरोग्य सल्लागार शिरीष साळवे यांचा स्तुत्य उपक्रम

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : अक्षय तृतीयाच्या मुहार्तावर पारनेर तालुका पत्रकार संघ व वरिष्ठ जागतिक आरोग्य सल्लागार स्वाती वालझाडे व शिरीष साळवे यांच्या संयुक्त विद्यमाने शहजापूर वन विभागातील पाणवठ्यामध्ये वन्य प्राणी जीवांची तहान भागवण्यासाठी पाणवठ्यात पाच हजार लिटर पाणी सोडण्यात आले.



वन विभागाकडून शहजापूर डोंगर परिसरात वन्य जीवांची तहान भागवण्यासाठी पाणवठे तयार करण्यात आले आहे. पाण्याच्या शोधात फिरताना जीव जाऊ नये म्हणून या पाणवठ्यात पारनेर तालुका पत्रकार संघ व स्वाती वेलनेस सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने पाच हजार लिटर पाणी सोडण्यात आले. या पाणवठ्यात टँकरच्या माध्यमातून पंधरा दिवसाला पाणी सोडून मुक्या प्राण्यांची तहान भागवली जाते. उन्हाळ्यात पाण्याची टंचाई जाणवत असल्याने वन्यजीव पाण्याच्या शोधात फिरताना मरतात. त्या मुळे वेळीच जंगलातील ठिकाणी तयार केलेल्या पाणवठ्यात मुबलक पाणी सोडण्यात आले आहे. हीच व्यवस्था कायम ठेऊन वन्य जीवांची संख्या कमी होणार नाही याची काळजी वन विभाग व सामाजिक कार्यकर्त्यांनी घेणे गरजेचे आहे.

या सामाजिक उपक्रम प्रसंगी वरिष्ठ आरोग्य सल्लागार स्वाती वालझाडे, जागतिक आरोग्य सल्लागार शिरीष साळवे, सामाजिक कार्यकर्ते अर्जुन भालेकर,आरोग्य सल्लागार डॉ.राजेंद्र गंधे,सागर हांडे, गणेश पवार ( मेजर), ज्योती पवार, स्वप्नाली गंधे, गणपत शिंदे, विमल शिंदे, गुलाब शेख, किरण मगर, सिद्धेश काळे, अरमान सय्यद, अशोक पडवी आणि पत्रकार भगवान गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

## दिव्यांग तरुणाच्या खून प्रकरणी दोघांना अटक

### मंचर पोलीसांनी सहा तासात लावला गुन्हाचा छडा

■ जनप्रवास प्रतिनिधी

निरगुडसर : मंचर ता.आंबेगाव येथे महात्मा गांधी विद्यालयाजवळ टपरी चालवणारा दिव्यांग तरुण गणेश रवींद्र सोनवणे वय २८ रा. शितकलवस्ती मंचर यांचा अज्ञात व्यक्तीने खून केल्याची घटना मंगळवार दि.२९ रोजी सकाळी उघडकीस आली होती. पोलिसांनी या खुनाचा छडा अवघ्या सहा तासात लावला असून या प्रकरणी दोन आरोपींना मंचर पोलिसांनी अटक केली आहे. सिद्धेश संतोष रेनके वय १९ रा. जुना बैलबाजार बानखेलेमळा मंचर व विघ्नेश अशोक शेवाळे वय २० रा. लांडेवाडी ता. आंबेगाव असे ताब्यात घेतलेल्या दोघांची नावे आहेत.

दिव्यांग तरुण रवींद्र सोनवणे वय २८ याचा खून झाल्याची घटना मंगळवार दि. २९ रोजी सकाळी उघडकीस आली होती. घटनेची माहिती कळताच मंचर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा करत अज्ञात व्यक्तीवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घडलेला गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सुनील धनवे व टीम यांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदाराच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीनुसार सहा तासाच्या आत सिद्धेश संतोष रेनके, व विघ्नेश अशोक शेवाळे या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. या दोघांनी गुन्हा कबूल केला असून गणेश, सिद्धेश व विघ्नेश हे तिघे मित्र असून दिनांक २८ रोजी रात्री ते टपरी शेजारील असलेल्या जुन्या महिंद्रा गाडीत बसले असताना त्यांच्यात चेष्टा मस्करी सुरू असताना त्यांच्यात वाद निर्माण झाला. वादाचे रूपांतर भांडणात होऊन घटनास्थळी असलेल्या बियरच्या बाटलीने गणेश याच्यावर वार करण्यात आले. पोटात व मानेवर वार झाल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. जास्त प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने गणेशचा घटनास्थळीत मृत्यू झाला असल्याचे पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी सांगितले. दरम्यान दोन्हीही आरोपींना मंचर पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सनील धनवे करत आहे.

## गौतम पब्लिक स्कूलच्या वैष्णवी पवारने जिंकली राज्यस्तरीय सिलंबम स्पर्धा

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

कोपरगाव : कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूलची इयत्ता नववी ची विद्यार्थिनी कु.वैष्णवी ज्ञानेश्वर पवार हिने राज्यस्तरीय शालेय सिलंबम स्पर्धा (१७ वर्ष मुली वयोगट) जिंकून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे अशी माहिती शाळेचे प्राचार्य नूर शेख यांनी दिली आहे.



स्पर्धेची विजेती वैष्णवी व तिचे पालक विनोद पवार यांचा शाळेचे प्राचार्य नूर शेख व रईसा शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व हाऊस मास्टर्स उपस्थित होते. राज्यस्तरीय शालेय सिलंबम स्पर्धा २८ ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान निमगाव कोऱ्हाळे, शिर्डी येथे पार पडली. या स्पर्धेत राज्यभरातून विविध विभागातील १५० स्पर्धक सहभागी झाले होते. कु. वैष्णवी पवार हिने आपल्या कौशल्यपूर्ण व नेत्र दीपक खेळाचे प्रदर्शन करून विजेतेपद पटकावले.

गौतम पब्लिक स्कूलमध्ये शाळेचे प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, बास्केटबॉल, हॉलीबॉल, बेसबॉल आदी खेळांचे व्यवसायिक प्रशिक्षण दिले जाते. त्या कामी आवश्यक आत्याधुनिक सोयी-सुविधा संस्थेचे मॅनेजमेंट उपलब्ध करून देत असल्याची माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष मा. आ. अशोकराव काळे, संस्था विश्वस्त आ. आशूतोष काळे, सचिव सौ.चैतालीताई काळे, व्हा. चेअरमन छबुराव आव्हाड, सर्व संस्था संचालक, प्राचार्य नूर शेख आदींनी कु. वैष्णवी पवार व तिचे प्रशिक्षक इसाक सय्यद व गौरी बारवकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कु.वैष्णवी पवार हीस क्रीडा संचालक सुधाकर निलक, सीलम्बम प्रशिक्षक गौरी बारवकर, क्रिकेट प्रशिक्षक इसाक सय्यद, हॉकी प्रशिक्षक रमेश पटारे, व्हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र आढाव, प्रकाश भुजबळ, उत्तम सोनवणे, नसिर पठाण, सोपान गांगुर्डे आदींचे मार्गदर्शन लाभले.

## राहुरी येथे चोरीचे भंगार घेऊन जाणाऱ्या गाडीवर कारवाई; दोघे ताब्यात

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी पोलीस पथकाने नगर मनमाड राज्य महामार्गावर तालुक्यातील राहुरी खुर्द येथे चोरीचे भंगार घेऊन जाणाऱ्या गाडीवर कारवाई केली. यावेळी पथकाने मुद्देमालासह दोघां जणांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला.

दि. २८ एप्रिल २०२५ रोजी रात्री १०.३० वाजे दरम्यान हवालदार भाऊसाहेब शिरसाट व दारकुंडे हे राहुरी तालुक्यातील राहूरी खुर्द परिसरात पेट्रोलींग करत होते. त्यावेळी त्यांना नगर मनमाड रोडवरुन एक विनानंबरचा तिन चाकी पॅगो अँपे माल वाहतुक रिक्षा हा विना लाइट लावता संशयास्पद रित्या तेथुन जाताना दिसुन आला. त्याचा संशय आल्याने पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करुन त्यास पकडले. त्यावेळी मालवाहतुक रिक्षामध्ये भंगार सामान घेऊन दोघेजण जात असल्याचे दिसून आले. पोलिस पथकाने त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. मालवाहतुक रिक्षा तसेच तिच्यातील भंगार लोखंडी सामान हे चोरीचे असल्याचे पोलीस पथकाची खात्री झाली. तेव्हा पोलिस पथकाने ७२ हजार रुपयांच्या मुद्देमालासह दोघा जणांना ताब्यात घेतले. हवालदार भाऊसाहेब संजय शिरसाट यांच्या फिर्यादीवरून आरोपी संजु पुनम भुसारे, वय ४३ वर्षे, रा. मांगवाडा, हनुमान मंदिराजवळ, संगमनेर तसेच रशिद हबीब सय्यद, वय ४० वर्षे, रा. राहुरी खुर्द, ता. राहुरी, या दोघांवर गुन्हा रजि. नं. ५०६/२०२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

## कुस्तीच्या आखाड्यात उतरला नऊ महिन्याचा "राया" पहिलवान

### मुक्ताबाई देवीच्या यात्रेतील आखाड्यात बाल पहिलवानाला पाहून प्रेक्षकांचा मोठा जल्लोष

■ जनप्रवास - किरण वाजगे

नारायणगाव : संपूर्ण महाराष्ट्र मध्ये यात्रा आणि जत्रांचा हंगाम सुरू असताना पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी भरवली जाणारी यात्रा म्हणजे नारायणगाव (ता. जुन्नर) ची मुक्ताबाई व काळोबा देवाची यात्रा. अवघ्या देशांमध्ये तमाशा पंढरी म्हणून ओळख असलेल्या या गावचे नाव एके काळचा पैलवान व माजी कामगार मंत्री स्वर्गीय साबीरभाई शेख यांच्यापासून ते विद्यमान खासदार डॉक्टर अमोल कोल्हे, याशिवाय भाऊ बापू मांग नारायणगावकर, विठाबाई नारायणगावकर, मंगला बनसोडे, तुकाराम खेडकर, पांडुरंग मुळे, रघुवीर खेडकर, चंद्रकांत ढवळपुरीकर आदी अन्य तमाशा कलाकारांनी मोठं केलं. याच गावच्या यात्रेत कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात आला. या कुस्तीच्या आखाड्यात देशभरातून मोठे मल्ल येतात आणि आपली कसरत दाखवतात. मात्र यंदाच्या या संपूर्ण आखाड्यामध्ये खरी रंगत आणली ती नऊ महिन्याच्या राया केदार वाडेकर या बाल पहिलवानाने. जेमतेम उभं रहायला सुरुवात झालेला हा मुलगा संपूर्ण कुस्त्या पहात होता. आणि तो त्याच्या मामाला म्हणजे नारायणगावचे माजी उपसरपंच संतोष वाजगे यांना हट्ट करत होता की, मला आखाड्यात जायचे आहे. तसे म्हणून तो हाताने



खुणवत होता. मामानेही हट्ट पूर्ण केलाच आणि राया नावाचं पोरगं आखाड्यात उतरले तेही अक्षरशः उघड्या अंगानी. झांज, तुतारी च्या निनादात, रताडाम तताडाम हलगी वाजू लागली आणि पोराला मैदानात फिरविण्यात आलं. कुस्तीचे नामवंत समालोचक हंगेश्वर धायगुडे यांनी बाळाचे पाय पाळण्यात दिसतात असे सांगत या मुलाचं कौतुक केलं आणि जो काही जल्लोष झाला तो खरोखर पाहण्यासारखा होता. भविष्यातील हिंदकेसरी या रणांगणात उतरला म्हणून संपूर्ण लोकांच्या अंगावर अक्षरशः शहारे उमटले आणि संपूर्ण मैदान टाळ्यांच्या कडकडाटात दैदिप्यमान झाले. ०राया केदार वाडेकर हा मूळचा पुणे मुंढवा येथील असून त्याचे आजोळ नारायणगाव आहे. त्याचे आजोबा नाना वाडेकर यांची खूप इच्छा आहे की माझ्या नातवाने पहिलवान व्हावे म्हणून. त्याची कदाचित ही सुरवात असेल .खरंतर नारायणगाव म्हटलं की, तमाशा पंढरी, विचारांच गाव, संस्कृतीच गाव, माणसाला माणसाप्रमाणे वागवणारं गाव, त्याही पेक्षा खाद्य संस्कृतीचं खरं खुरं ठिकाण म्हणजे नारायणगाव . या गावात अनेक पहिलवान घडले. हे जरी खरे असले तरीही अवघ्या नऊ महिन्याच्या लहानग्याने आखाड्यात उतरायची अपेक्षा व्यक्त करणे हाही मोठा चर्चेचा विषय ठरला आहे.

# शाळेच्या इमारतीसाठी जागामालकांचा रस्ता बंद करण्याचा डाव; आत्मदहनाचा इशारा

■ जनप्रवास वार्ताहार

राजगुरूनगर :गावातील विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिक्षणासाठी म्हणून शाळेसाठी आमच्या पूर्वजांनी जागा दिली. परंतु आज या शाळेच्या काही कारभाऱ्यांनी मात्र आता आमचे मार्गच बंद करायचा घाट घातला आहे. पूर्वापार असलेली आमची निवासी वसाहत आणि त्याला जाण्यायेण्याचा रस्ताच बंद झाला तर आम्ही राहायचे कसे ?आमच्या घरात, जागांमध्ये जायचे कसे? हा प्रश्न आहे. यासाठी संरक्षक भिंत व आमच्या वहीवाटीच्या रस्त्यात शाळेचे बांधकाम करू नये, अन्यथा आम्हाला उपोषण अथवा आत्मदहन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. असा इशारा पत्रकार परिषदेत दोंदे (ता. खेड ) येथील सुकाळे मंडळी (ब्राह्मणवाडा ) येथील शिवकुमार सुकाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिला.


दोंदे (ता. खेड ) येथील सुकाळे मंडळी (ब्राह्मणवाडा ) यांच्यावर होत असणाऱ्या अन्यायाबाबत पत्रकार परिषदेत माहीती देताना शिवकुमार सुकाळे व इतर.

याविषयी बोलताना शिवकुमार सुकाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितले की, दोंदे येथे १९६२ पासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. या शाळेला आमच्या पूर्वजांकडून जागा घेण्यात आली असे काही व्यक्तींचे मत आहे. परंतु याबाबतचे कोणतेही बक्षीसपत्र, संमतीपत्र, खरेदीखत केलेले नाही. आमचे पूर्वज अशिक्षीत असल्याचा गैरफायदा त्यावेळी घेण्यात आला. केवळ तोंडी बक्षीसपत्राद्वारे ही जागा दिली अशी तात्कालीन नोंद करून गावातील तात्कालीन प्रमुखांनी आमच्या जागा घेतल्या. या शाळेत पहिली ते सातवीचे वर्ग चालविले जात असून २२० विद्यार्थ्यांची पटसंख्या आहे. सध्या दहा वर्ग खोल्या अस्तित्वातही आहेत. शाळेला आमचा विरोध नाही. तरीही संपूर्ण जागेलाच संरक्षक भिंत बांधून आत शाळेची नवीन इमारत बांधण्याची भूमिका सध्याच्या शालेय व्यवस्थापन मंडळाने घेतली आहे.

याच जागेतून जाणे येण्यासाठी आमचा पूर्वापार वहिवाटीचा रस्ता आहे. शाळेची बांधकाम करायला इमारत बांधायला आमची कोणतीही हरकत नाही. परंतु त्याकरीता आमच्याच जागेतील आमचा रस्ता बंद करू नये. अशी आमची मागणी आहे.

याबाबत प्रशासनाने आम्हाला न्याय द्यावा. आमची ३० कुटुंबे येथे पिढ्यानपिढ्या राहत आहेत. आमचा नैसर्गीक वहीवाटीचा मार्ग बंद करुन आम्हाला त्रास देऊ नये. अन्यथा आम्हाला प्राणांतीक उपोषण अथवा आत्मदहन करावे लागेल. असा इशारा सुकाळे मंडळीनी दिला आहे. याविषयी राज्याचे मुख्यमंत्री, पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी शिवकुमार सुकाळे यांच्यासह नितीन सुकाळे, किरण सुकाळे, बाळासाहेब सुकाळे, समिर सुकाळे, संदिप सुकाळे, गोरक्ष सुकाळे, अमित सुकाळे, रूपेश सुकाळे, दिनकर सुकाळे, रोहीदास सुकाळे आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेचे शिर्डी-कोपरगाव मध्ये आ. आशुतोष काळेंनी हजारो कार्यकर्त्यांसह मोठ्या उत्सवात केले स्वागत

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

कोपरगाव : राज्यात प्रथमच राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने संपूर्ण राज्यात संयुक्त महाराष्ट्राच्या ६५ व्या वर्ष स्थापना दिनानिमित्ताने महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रा काढण्यात आल्या असून मुंबई येथे १ मे रोजी गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. हि महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रा शिर्डी-कोपरगाव येथे आली असता आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव व शिर्डी मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत या यात्रेचे स्वागत केले.



राज्याच्या जडण घडणीत अजोड योगदान देणाऱ्या थोर व्यक्तींच्या कार्याची आठवण म्हणून महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे ते ४ मे दरम्यान मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने 'गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे' भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात 'महाराष्ट्र गौरव' मंगल कलश रथ यात्रा काढण्यात आली आहे. या मंगल कलश रथ यात्रेत महाराष्ट्राच्या प्रत्येक भागातील महापुरुषांच्या वास्तव्याने समृद्ध झालेल्या प्रदेशांतील माती व पाणी मंगल कलशांमध्ये एकत्रित करण्यात येत आहे. हि मंगल कलश यात्रा बुधवार (दि.३०) रोजी शिर्डी-कोपरगावमध्ये आली असता आ.आशुतोष काळे यांनी 'महाराष्ट्र गौरव' मंगल कलश रथ यात्रेचे स्वागत केले.

याप्रसंगी बोलतांना आ.आशुतोष काळे पुढे म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर संयुक्त महाराष्ट्राच्या ६५ व्या वर्ष स्थापना दिनानिमित्ताने महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रा काढण्यात आल्या आहेत. या निमित्ताने आपल्या महाराष्ट्राची परंपरा व जगावेगळी असलेली संस्कृती जपण्याचा व आपल्या वैभवशाली इतिहासातून या भूमीच्या महापुरुषांचा वारसा पुढे घेवून जाण्याचा उद्देश सार्थ होवून महाराष्ट्राचा अमृत कलश असाच पुढे पुढे जात राहील असे त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस रविंद्र पाटील, विद्यार्थी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, मा.आ.लहु कानडे, शिर्डी लोकसभा कार्याध्यक्ष अशोक कानडे, युवक जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव, बाबासाहेब कोते, कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, शहराध्यक्ष सुनील गंगुले, युवक अध्यक्ष नवाज कुरेशी,कार्याध्यक्ष संतोष चवंडके,रमेश गवळी, बाळासाहेब रुईकर, अशोक आव्हाटे, डॉ.कुणाल घायतडकर, प्रकाश दुशिंग, आकाश डागा, ॲड.मनोज कडू, युवक तालुकाध्यक्ष शशिकांत देवकर, युवक शहराध्यक्ष नवाज कुरेशी,राहाता तालुकाध्यक्ष संदीप सोनवणे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व सलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक मंडळ, तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती,संचालक, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक,आदींसह शिर्डी व कोपरगाव व राहाता मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निरगुडसर येथे बिबट्याने केली कालवडीची शिकार


निरगुडसर येथील विकासनगर येथे बिबट्याने केलेल्या हल्ल्याच्या ठिकाणी वनरक्षक अश्विनी डफळ यांनी भेट देऊन पंचनामा केला.

■ जनप्रवास प्रतिनिधी

निरगुडसर : निरगुडसर ता. आंबेगाव येथील विकासनगर (डफळी) येथे बिबट्याने गोठ्यात बांधलेल्या कालवडीची शिकार केल्याची घटना बुधवार दि. ३० रोजी पहाटे दोन अडीच वाजताचे सुमारास घडली आहे.

निरगुडसर ता. आंबेगाव येथील निरगुडसर - मेंगडेवाडी रस्त्यावर असलेल्या विकासनगर (डफळी) येथील शेतकरी विकास मारुती मेंगडे यांच्या ओपन गोठ्यात सहा गाई, दोन शेळ्या, एक बैल व अडीच महिन्याची कालवड असून. बिबट्याने बुधवारी पहाटे अंदाजे दोन, अडीच वाजता गोठ्यात प्रवेश करत दोरीने बांधलेल्या कालवडीला ठार केले तिला ओढून लांब नेण्याचा प्रयत्न केला मात्र कालवड दोरीने बांधलेली असल्याने ती बाहेर नेता न आल्याने बिबट्याने जागेवर तिचा फडशा पाडला. सकाळी शेतकरी विकास मेंगडे हे उठले असता त्यांना गोठ्यात कालवड मृत अवस्थेत दिसली याबाबत त्यांनी वनविभागाचे अधिकारी यांना कळविले असता वनरक्षक अश्विनी डफळ, वनमजूर दशरथ मेंगडे यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे.

या परिसरात बिबट्याचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात असून विकास मेंगडे यांच्या गोठ्यातील बारा कोंबड्या बिबट्याने सहा महिन्यापूर्वी फस्त केल्या आहेत. तसेच सहा महिन्यापूर्वी एक पाळीव कुत्रा व दोन महिन्यापूर्वी एक पाळीव कुत्रा अशी दोन कुत्रे देखील ठार केले आहेत. रात्रीच्या वेळी अनेकदा बिबट्या त्यांनी घराच्या समोर पाहिला आहे. त्यामुळे या ठिकाणी पिंजरा लावुन बिबट्यास जेरबंद करावे अशी मागणी स्थानिक शेतकरी विकास मेंगडे, कैलास सुडके, डॉ. विलास मेंगडे, मंगेश सुडके, हरीश सुडके, विशाल मेंगडे, राजू वळसे, शाहरुख इनामदार, प्रसाद मेंगडे यांनी केली आहे.

# अनिल सानप यांची तक्रार मुख्यमंत्री कार्यालयाकडे !

## अनिल सानप यांचे बदलीपूर्वी निलंबन फिक्स !

> तब्बल १८ वर्ष शेवगाव आणि पाथर्डी या दोन तालुक्यातील पंचायत समितीच्या ग्रामीण पाणीपुरवठा आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचा उपअभियंता म्हणून एकाच व्यक्तीकडे नियमबाह्य पद्धतीने पदभार ठेवण्यात आला यामुळे अनिल सानप नावाच्या आकाने ठेकेदारांशी संगणमत करून लाखो रुपयांची माया जमवली यामुळे आता त्यांची बदली न करता त्यांचे कायमस्वरूपी निलंबन करण्यात यावे यासाठी ५ मे ला मुख्यमंत्री कार्यालयाकडे आणि ग्रामीण पाणीपुरवठा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग प्रधान सचिव त्यांच्याकडे वेळ मागितली आहे लेखी तक्रार ईमेल द्वारे केली आहे परंतु प्रत्यक्षात अनिल सानप यांच्या भ्रष्ट कारभाराची यादी प्रधान सचिवांकडे मांडून त्यांचे निलंबन करण्यासाठी भाग पाडू.
>
> - किसन आव्हाड

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाथर्डी : पाथर्डी आणि शेवगाव तालुका पंचायत समिती येथे तब्बल १८ वर्षापासून एकाच ठिकाणी ग्रामीण पाणीपुरवठा सार्वजनिक बांधकाम उपभियंता या पदावर कार्यरत असलेले भ्रष्ट अधिकारी अनिल सानप यांची तक्रार मुख्यमंत्री कार्यालयाकडे केली आहे याबाबत ग्रामीण पाणीपुरवठा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग प्रधान सचिव यांना मुख्यमंत्री कार्यालयाकडून चौकशीचे आदेश देण्यात येतील यावर अनिल सानप यांनी पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यात जिल्हा परिषद अंतर्गत सार्वजनिक बांधकाम रस्ते जल जीवन मिशन योजनेच्या कामातील भ्रष्टाचार सन २०१८-१९ टँकर घोटाळा झालेला असताना चौकशी अहवाल न देता परस्पर ठेकेदाराची बिले देणे जिल्हा परिषद पंधरावा वित्त आयोग अंतर्गत पाथर्डी तालुक्यातील १०७ ग्रामपंचायतीमध्ये आरो प्लांट आणि कचरा व्यवस्थापन कचरा कुंडी हौद बांधणे या कामात कॉलिटी कंट्रोल मार्फत व्हेरिफिकेशन न करता कम्प्लिशन सर्टिफिकेट देणे व एमबी वर अनिल सानप यांनी ग्रामीण पाणीपुरवठा आणि सार्वजनिक बांधकाम उपअभियंता म्हणून केलेल्या नियमबाह्य दोन स्वाक्षऱ्या यातून ठेकेदाराची दिलेली बोगस बिले आणि लाखो रुपयांचा केलेला भ्रष्टाचार या केलेल्या कामांची खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश देण्यात येण्याची दाट शक्यता आहे जर अनिल सानप यात दोषी आढळले तर त्यांची सेवा समाप्त करून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची लेखी तक्रार देण्यात आली आहे.

# यात्रौत्सव नियमांचे व वेळेचे पालन करून शांततेत पार पाडावा : पो.नि.चौधरी

## अनूचित प्रकार घडल्यास कडक कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : टाकळीभान येथील शंभू महादेव यात्रा महोत्सवाच्या काळात विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम शांततेमध्ये साजरे करताना नियमाचे व वेळेचे पालन करून पार पाडले तर पोलीस प्रशासन नेहमीच यात्रा कमिटीला सहकार्य करेल आणि यात्रा कमिटीने पोलीस प्रशासनाला मदत म्हणून २५ ते ३० युवकांचे स्वयंसेवक पथक स्थापन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी केले..नुकतीच टाकळीभान येथील शंभू महादेव यात्रोत्सवानिमित्त यात्रा सुरक्षित पार पाडावी यासाठी यात्रा कमिटी,



ग्रामस्थ व पोलीस प्रशासनाची महादेव मंदिर प्रांगणामध्ये बैठक पार पडली. यावेळी श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी बैठकी प्रसंगी उपस्थित यांना मार्गदर्शन करताना केले. श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील शंभू महादेवाची यात्रा ही सर्वात मोठी समजली जाते या यात्रेसाठी दहा ते बारा खेड्यांमधून जनसमुदाय महादेवाच्या दर्शनासाठी येत असतो यात्रेनिमित्ताने विविध कार्यक्रम साजरे होत असतात, परंतु हे कार्यक्रम सादर करत असताना वेळेचे व नियमाचे पालन करून सादर करावेत व पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन चौधरी यांनी तर केलेच परंतु यात्रेच्या काळात कोणीही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी यात्रेमध्ये शांततेचा भंग केल्यास व अनुचित प्रकार घडविण्याचा प्रयत्न केला तर पोलीस प्रशासनाकडून त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल. असा इशारा पोलीस निरीक्षक चौधरी यांनी दिला .

# पाच पैकी एका दरोडेखोराला कात्रड ग्रामस्थांनी पकडून केले पोलिसांच्या हवाली

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी तालुक्यातील कात्रड येथे काही ग्रामस्थांनी मिळून घरफोडीच्या तयारीत असलेल्या पाच दरोडेखोरां पैकी एकाला पकडुन पोलिसांच्या स्वाधीन केले. तसेच पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

सदाशिव नाना सत्रे, वय ३९ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे राहत असुन त्यांची कात्रड शिवारात शेत जमीन आहे. २८ एप्रिल २०२५ रोजी पहाटे १.३० वाजे दरम्यान सदाशिव सत्रे यांच्या शेताच्या कडेला एक विना नंबरची झेनॉन पिकअप गाडी उभी होती. त्यावेळी ग्रामस्थांना संशय आल्याने सदाशिव सत्रे, संदिप दांगट तसेच परिसरातील काही लोक त्या गाडी जवळ गेले. तेथे गाडीजवळ पाच अनोळखी इसम हाथात लोखंडी टॉमी, सुरा, दोरी, कत्ती, स्क्रू डायव्हर, पान्हा, घेवुन उभे असलेले दिसले. त्यावेळी तुम्ही कोण आहात, येथे काय करता, असे ग्रामस्थांनी विचारले असता आरोपी गाडी व त्यांचे कडील साहित्य जागीच टाकुन तेथुन पळून जाऊ लागले. तेव्हा ग्रामस्थांनी त्या पाच दरोडेखोरां पैकी शुभम शिवाजी माळी याला पकडले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले. बाकीचे चार आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. पकडलेल्या आरोपीने पळून गेलेल्या आरोपींचे नाव व पत्ते सांगीतले. सदाशिव नाना सत्रे यांच्या फिर्यादीवरून आरोपी शुभम शिवाजी माळी, वय १८ वर्षे व सागर रमेश माळी, दोघे रा. वंजारवाडी, सोनई, ता. नेवासा, तसेच सोनु माळी, रोहित पवार, दोघे रा. सडे, ता. राहुरी, व सुरज बर्डे, रा. पानसवाडी, ता. नेवासा, या पाच जणांवर गुन्हा रजि. नं. ४९६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१० (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक समाधान फडोळ हे करीत आहे.

# चार-पाच नंबर साठवण तलाव जोडणी काम जलद गतीने पूर्ण करा : आ.आशुतोष काळे

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

कोपरगाव : कोपरगाव शहरातील नागरीकांना नियमित पाणी मिळावे यासाठी सुरु असलेल्या चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीचे काम तातडीने पूर्ण करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना व सबंधित ठेकेदारास दिल्या आहेत.

आ. आशुतोष काळे यांच्या भगीरथ प्रयत्नातून पाच नंबर साठवण तलावाची निर्मिती झाली. त्यामुळे कोपरगाव शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या एक ते चार साठवण तलावांचा भार हलका होवून नागरीकांना मोठा दिलासा मिळाला आहे. परंतु नागरीकांना नियमित व पूर्ववत पाणी पुरवठा कसा करता येईल यासाठी आ. आशुतोष काळे यांचा सातत्याने खटाटोप सुरु असून त्या खटाटोपातून चार व पाच नंबर साठवण तलाव जोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाचा आ. आशुतोष काळे यांनी नुकताच आढावा घेत माहिती घेतली.



ज्याप्रमाणे पाच नंबर साठवण तलावाचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत आ. आशुतोष काळे या साठवण तलावाच्या कामावर बारीक लक्ष ठेवून होते त्याप्रमाणेच सुरु असलेल्या चार व पाच नंबर साठवण तलाव जोडणीच्या कामावर ते बारीक लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष भेट देवून सुरु असलेल्या कामाबाबत माहिती घेत लवकरात लवकर काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. गुरुवार (दि.०१) पासून गोदावरी कालव्यांना उन्हाळी आवर्तन सोडण्यात येणार आहे. त्यामुळे येणाऱ्या आवर्तनातून सर्वच्या सर्व एक ते पाच साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरून घेण्यासाठी सुरु असलेले काम लवकरात लवकर होणे गरजेचे आहे. जेणेकरून कोपरगाव शहरातील नागरिकांना नियमित व पूर्ववत पाणी पुरवठा करण्यासाठी चार नं.साठवण तलावातून पाच नं.साठवण तलावात व पाच नं.साठवण तलावातून चार नं.साठवण तलावात पाणी उचलणे सहज शक्य होणार आहे. त्यासाठी हे काम लवकर पूर्ण करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना व सबंधित ठेकेदारास दिल्या आहेत.

# मनात व डोक्यात नेहमी असावेत सकारात्मक विचार




समाजाची सरंचना पूर्णपणे युवा अवस्थेवर अवलंबून असते. समाजाची प्रगती युवकांमार्फतच होऊ शकते. आजचा युवा वर्गच उद्याची पारिवारिक स्थिती सांभाळेल व येणारी नवीन पिढी त्यांचे अनुकरण करेल. वर्तमान व भविष्य दोन्ही युवाच सांभाळू शकतील. युवावर्ग ही एक अशी शक्ती आहे की प्रगतीची क्रांती करुन विकासाचा मार्ग बनवू शकते. परंतु असे दिसून येते की, आपले व्यक्तीमत्व आकर्षक बनविण्यासाठी वर-वरती चमकधमक महत्वाची आहे असे आजकालचे युवा मानतात. चांगले कपडे घालणे, गाड्यांमध्ये फिरणे, पार्ट्यांना जाणे, महाग सौंदर्य प्रसाधने, वापरणे, महाग भेटवस्तू मित्र मंडळींना देणे इ. हे सर्व क्षणिक आकर्षण आहे. वास्तविक आकर्षण तर एखाद्या व्यक्तीच्या व्यवहारावरुन, त्याच्या सवयीवरुन व त्याच्यातील गुणांवरुन ठरविले जाते.

व्यवहारिक ज्ञान कोणत्या शाळेतून, कॉलेजमधून पुस्तके वाचून मिळत नसते तर ते घर परिवार, शेजारी, समाज यांच्या निरीक्षणातून, ऐकून बघून प्राप्त होते.

- आपल्या व्यवहारात नेहमी सॉरी व थँक यू’ हे दोन शब्दप्रयोग वापरा. तुमची प्रत्येक ठिकाणी स्तुती करतील.
- जीवनरुपी शृंगाराचा अत्यावश्यक हिस्सा म्हणजे विनम्रता यामुळे तुमचे व्यक्तीमत्व अजून उजळेल.
- आपल्या पेक्षा मोठ्यांचा आदर व लहांनाना स्नेहपूर्वक वागणूक द्या. समाजात स्नेह व सन्मान या एकमेकांच्या कड्या आहेत.
- घरात, नातेवाईकांमध्ये, मित्रांमध्ये वावरताना वातावरण शांतीपूर्ण असेल याकडे लक्ष द्या. आपल्या वाणीत माधुर्य आणा.
- आपली चूक स्वीकारायला शिका, त्यामुळे नवीन काही शिकायला मिळेल.
- इतरांची निंदा करण्याची प्रवृत्ती टाळा. त्यामुळे तुम्ही दुसऱ्यांच्या नजरेतून पडू शकता.
- मित्रांची खोटी स्तुती करु नका. उलट त्यांच्या चुका, कमजोरी, वाईट सवयी, दुर्गुण त्यांच्या निदर्शनास आणून द्या व सुधारण्यासाठी त्यांना मदत करा.
- इतरांना मदत करण्याची सहयोगी देण्याची सवय अंगी बाळगा दुसऱ्यांच्या सुख-दु:खात, आजारपणात त्यांची मदत करा.
- वेळेचे महत्व समजून घ्या व वेळेचा सदुपयोग करा.
- क्रोधाला आवर घाला, त्यापासून सावध रहा कारण क्रोध मनुष्याच्या स्वास्थाला व डोक्याला मेंदूला अतिशय हानिकारक आहे.
- मनात व डोक्यात नेहमी चांगले विचार ठेवा. सकुंचित विचार डोक्यातून काढून टाका.
- अंधविश्वासू बनू नका. कोणतीही गोष्ट तर्कशुद्ध कसोटीवर परिपूर्ण ठरल्यानंतरच तिचे पालन करा.
- नेहमी नव-नवीन शिकण्याची इच्छा बाळगा. शिकण्यासाठी वयाची अट नसते हे लक्षात ठेवा. प्रत्येकामध्ये काही ना काही चांगले गुण असतात ते गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न करा.
- आपल्या कामात नेहमी मेहनत, इमानदारी आणि मन लावून काम करणे इ. चा समावेश असू द्या.
- स्वावलंबी बना. इतरांवर आपले काम सोपवू नका.
- अहंकारापासून चार हात लांब रहा. अहंकारी व्यक्ती आपले व्यक्तीमत्व धुसर व अंधुक बनवते.

## कुटुंबात मानसिक आधार महत्वाचा...

कौटुंबिक जीवनात नातेवाईकांची परिस्थिती कशी आहे यापेक्षा सुद्धा ती मनाने परस्परांशी कसे वागतात, चांगले स्नेह मैत्रीचे संबंध ठेवतात की नाही एकमेकांना अडचणीच्या आणि नंतरही मानसिक आधार देतात का ? याला अधिक महत्व असते. ज्यांची नाती अकाली कालवश होतात वा काही कारणांमुळे अखेरपर्यंत टिकत नाहीत, त्यांना घोर मानसिक आघाताला सामोरे जावे लागते. एखादी व्यक्ती स्वत:ला दु:खातून किती लवकर सावरू शकते हे सर्वस्वी त्याच्या ‘विल पॉवर’वर अवलंबून असते. बहुधा महिलांनाच मानसिक आघाताला जास्त सामोरे जावे लागते. स्वप्नांचा महाल, सुखी संसार जेव्हा उद्ध्वस्त होतो तेव्हा त्याचा खूपच जबर धक्का बसतो. या दु:खातून जो गेलेला असतो तोच समजू शकतो. प्रत्येकजण जीवनात वेगवेगळ्या गोष्टींना महत्त्व देत असतो. कोणाला प्रेम महत्त्वाचे वाटते तर कोणाला करियर. आपल्याला जे हवे ते मिळेल याविषयी स्वप्ने पाहायला काहीच हरकत नाही; पण त्यासोबतच व्यावहारिक दृष्टीकोनही ठेवणे अत्यंत गरजेचे असते. स्वप्नांची हवा कधीही




डोक्यात शिरू देऊ नये. कारण जेव्हा ती स्वप्ने भंगतात तेव्हा खूपच त्रास होतो; परंतु कोणत्याही स्थितीत आपली हिंमत सोडू नये आणि आपले ध्येय गाठण्यातच सातत्याने प्रयत्न करीत राहावे.

कधी-कधी महिला आपले ध्येय गाठण्यात अपयशी ठरल्यानंतर हतबल होऊन डिप्रेशनने घेरल्या जातात. त्यांनी आपण पुन्हा प्रयत्न केला तर यशस्वी होऊ शकतो हे समजून घ्यायला हवे. अपयश आपला आत्मविश्वास डळमळीत करीत असते हे खरे; पण आपणही धैर्य बाळगायला हवे. आपले धैर्य, आपली हिंमत टिकून राहण्यासाठी खालील सल्ला अनुसरा.

- अपयश पदरी पडेल तेव्हा सर्वप्रथम स्वत:ला भावनिक रूपाने कमकुवत होऊ देऊ नका. स्वत:ला नशिबाच्या हाती सोपवू नका. स्वप्नांच्या महालाच्या ठिकऱ्या झाल्यातरी त्या पुन्हा जोडू शकता; पण त्यासाठी हिंमत सोडू नका.
- आपले लक्ष रचनात्मक कामात जास्त गुंतवा. उदा. काही लिहिण्याचा प्रयत्न करा लेखन हे भावना व्यक्त करण्याचे सर्वश्रेष्ठ माध्यम आहे.
- घरी कधीही एकट्या राहू नका. त्यामुळे भीती वाढते. जर दुसरा काहीच पर्याय नसेल, तर घरातील किरकोळ कामे करीत राहा व एखाद्या मैत्रिणीला फोन करून गप्पा मारा शॉपिंगसाठी बाहेर पडल्यानेही मन हलके होईल.
- जर आपण थोडे जरी मन घट्ट केले, तर लवकरच दु:खातून बाहेर पडाल. काळ साऱ्या जखमा भरेल; पण त्यासाठी थोडा संयम हवा.
- स्वत:वर विश्वास ठेवा. एक स्वप्न भंगले याचा अर्थ स्वप्न पाहायचेच सोडून द्यावे असा नव्हे.

## स्वत:च्या जीवनाचे बना शिल्पकार



जेव्हा आपण एखादी कला शिकण्याचा विचार करतो तेव्हा त्या कलेविषयी मनात आत्मीयता असते. ती शिकण्याची आत्मसात करण्याची उर्मी असते. आणि शिकल्यानंतरही ती कला साकारताना आपल्या मनात आनंदाच्या उर्मी उठत असतात. आपल्यात असा काही खास गुण असावा की, ज्याच्या बळावर इतरांना आपल्याकडे आकर्षित करता येईल. अशी प्रत्येकाचीच मनीषा असते. त्यासाठी आपल्याला आपले जीवन व्यर्थ जाऊ देता कामा नये. त्यातील प्रत्येक क्षण सृजन करायला हवा. आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार व्हायला हवे. यासाठी गरज आहे स्वत:शी प्रामाणिक होण्याची.

आपण जे काम करतो ते जर प्रसन्नतेने केले, प्रेमाने केले, निस्वार्थपणे केले तर ते काम आपोआपच सृजन होते याचाच अर्थ काम करताना स्वत:ला फसवू नका. स्वत:च्या नजरेत स्वत:च्या नजरेत स्वत: कमी होऊ नका. त्याचबरोबर इतरांशीही लबाडीने, कपटाने वागू नका.

सृजनतेसाठी माणसाने आपल्या जीवनात संतुलन वाढवायला हवे. जीवन म्हटले की चढ-उतारही येतात. जो वेगवेगळ्या परिस्थितीत समान भावनेने झेलतो व निराशा, उदासीनतेपासून दूर राहतो त्याच्याच अंतरी आशा, प्रसन्नता व आनंदाचा प्रकाश पसरतो. अशीच माणसे खरी कलाकार, सृजनकार होतात. कारण ती आपण अंत:स्फूर्तीने साकारत असतो ती कोणी आपल्यावर लादलेली नसते.

हीच गोष्ट आपल्या कामाबाबतही आपण आपण जोपासायला हवी. आपण करीत असलेले काम आपण निवडलेलेच असते. तर मग त्याबाबत फक्त पाट्या टाकणे ही भावना का ठेवायची ? जर आपल्याला एकादे काम आवडत नसेल तर ते करण्यात आपला वेळ वाया का दवडायचा ! कारण यातून ते कामही व्यवस्थित होत नाही व आपणही आपले अमूल्य जीवन वाया दवडीत असतो.

जर आपण आपले काम एक कला म्हणून जोपासले तर नक्कीच ते जास्त अस्थेने, तळमळीने करू शकतो. नवनवीन बदल घडवू शकतो व ते काम व्यवस्थित व उत्तमरीत्या पार पाडल्याचा आनंद मिळवू शकतो. हा आनंद त्या कामाच्या पैशारुपी, प्रसिद्धीरूपी मोबसल्यापेक्षा कैकपटीने मोठा असतो. जी आनंदाने केली जातो ती कला असते. व जे बळजबरीने केले जाते ते काम असते. आपणच ठरवा की आपल्याला आपली कला जोपासायची आहे की फक्त कामच करीत राहायचे आहे.

## लग्न ही जीवनातील अत्यंत महत्वाची बाब



वयात आलेल्या, सज्ञान झालेल्या मुलीबद्दलची चिंता तिचे हात पिवळे करून तिला निरोप देईपर्यंत आई-वडिलांना सतावीत असते. सर्वच आई-वडिलांना मुलीच्या काळजीतून मुक्त होण्याची घाई असते. त्यामुळेच तिचे लग्न लावून देताना ते तिच्या भावनांचा विचारही करीत नाहीत. ज्यामुळे लग्नानंतर तिच्या वैवाहिक जीवनात अनेक प्रश्न उपस्थित होतात. लग्न ही जीवनातील अत्यंत महत्वाची बाब असते. त्यात स्त्रीला सहनशील, त्यागी व समर्पित व्हावे लागते व त्यानंतर तिच्या जीवनाला नवे वळण मिळणार असते. तसे घरातील सर्वांचीच मुलीला तिच्या सासरी सुखी, आनंदी पाहण्याची इच्छा असते. म्हणूनच तिचे लग्न उत्तम, सुखवस्तू कुटुंबातील मुलाशी करण्याची इच्छा ते बाळगून असतात. परंतु अशावेळी त्यांच्याकडून मुलीच्या इच्छेकडे, आवडी-निवडीकडे दुर्लक्ष केले जाते. त्याला महत्व दिले जात नाही व एखादा मुलगा बरा वाटला की, चटकन मुलीचे लग्न करण्याची घाई त्यांच्याकडून केली जाते.

या घाईगडबडीत मुलाच्या सवयी, घर-घराणे, वागणे याचाही विचार केला जात नाही. तसेच मुलाच्या मानसिक, शारीरिक गुणदोषांचाही विचार केजा जात नाही व याचा त्रास मुलीला भोगावा लागतो. बहुधा मुलीच्या शिक्षणाला काहीच किंमत दिली जात नाही. मॅट्रिक-नॉनमॅट्रिक मुलाशी बी.ए.पास मुलीचेही लग्न लावून दिले जाते. का तर तो सरकारी नोकरी करतो आहे म्हणून. त्यामुळे तिचे जीवन सर्वस्वी आई-वडिलांच्या निर्णयावरच अवलंबून असते. परंतू आता जमाना बदलला आहे. पूर्वी लहान वयातच मुलींची लग्ने होत असल्यामुळे त्यांना त्याबाबत समजही कमी होता. त्यामुळेच सासर व मुलींची लग्ने होत असल्यामुळे त्यांना त्याबाबत समजही कमी होता. त्यामुळेच सासर व मुलगा याचा विचार तिच्या माता-पित्यांना व घरातील इतर वडीलधाऱ्यांना करावा लागत असे. पण आता मुलगी वयात आल्यानंतर, शिकून-सवरुन सुजाण व सज्ञान झाल्यानंतर तिच्या भावी आयुष्याबद्दल व पतीबद्दल ती विचार व कल्पना करु शकते. त्या जाणून घेणे अत्यंत गरजेचे असते. विशेषत: मुलीच्या आई, वहिनी व मोठ्या बहिणींनी याबाबत पुढाकार घ्यायला हवा.

## पुरुषांचा लाळघोटेपणा नैसर्गिक

कितीही नाही म्हटले तरी पुरूषांना आपल्या सभोवती स्त्री असावी असे वाटते यात काहीही खोटं नाही. स्त्री सहवास त्याला सुखावणारा असतो. स्त्रियांशी लाळघोटेपणा करायलाही त्याला आवडतो. पण त्याच्या या स्वभावाला निसर्ग कारणीभूत असल्याचे आता शास्त्रीय संशोधनातून सिद्ध झाले आहे.

सुंदर स्त्री आजूबाजूला असली की शरीरातले टेस्टॅटेरॉन आणि कार्टिसोल या हार्मोन्सची संख्या तात्पुरती वाढते. या हार्मोन्सच्या वाढण्यामुळे पुरूषाच्या हजरजबाबीपणालाही धार येते, शिवाय त्याला मस्त वाटते. पण तीच स्त्री दुसऱ्या कुठल्या पुरूषाशी बोलत असेल वा त्याच्यात रस घेते आहे, असे लक्षात आले तर मात्र या दोन्ही हार्मोन्सची पातळी खाली घसरायलाही वेळ लागत नाही. त्यामुळे नैराश्य आणि चीडचीडही होते. कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या संशोधकांनी यासंदर्भात संशोधन केले आहे. त्याचे निष्कर्ष रॉयल सोसायटीच्या मासिकात प्रसिद्ध झाले आहेत. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. जेम्स रॉनी यांनीही या निष्कर्षांना पुष्टी दिली असून पुरुष स्त्रीशी बोलल्यास हे दोन्ही हार्मोन्स वाढतात, मात्र, ती स्त्री इतर कुठल्या पुरूषाशी बोलू लागली की याचे हार्मोन्स घसरतात, असे ते म्हणाले. १८ ते २४ वयोगट असलेल्या १४९ विद्यार्थ्यांमध्ये हे सर्वेक्षण करण्यात आले.

## कपडे खरेदी करताना...



हल्ली पंजाबी सूट व बंटी बबली स्टाइल सूटची जास्त फॅशन आहे. सडपातळ बांध्याच्या मुलींना ते शोभून दिसतील.

ज्या मुली उंच आहेत व त्या उंची कमी दर्शवू इच्छित असतील, तर आडव्या लायनिंगच्या ड्रेसने त्या उंची कमी दर्शवू शकतील याऊलट कमी उंचीच्या मुली उभ्या लायनिंगच्या ड्रेसद्वारे आपली उंची जास्त दर्शवू शकतील.

तरूण मुलींमध्ये स्कर्टस, जीन्स, कॅपरीजची जास्त फॅशन आहे; परंतु नेहमी आपल्याला शोभून दिसणारेच ड्रेस घालावेत. फॅशनपायी दिसेल तो ड्रेस परिधान करू नये. कारण त्यामुळे विनाकारण आपण सर्वांच्या दृष्टीने चेष्टेचा विषय होतो.

कपडे खरेदी करताना आपला रंग कसा आहे ते आवर्जून पाहावे. सावळ्या रंगावर गडद रंगाचे कपडे जास्त शोभून दिसतात तर गोऱ्या रंगावर सर्व रंगांचे कपडे शोभतात.

कपडे परिधान करताना ऋतूचा खास विचार करावा. जर उन्हाळा असेल, तर सौम्य रंगांचे कपडे शोभून दिसतील, तर थंडीत भडक रंगांचे कपडे सुखावह दिसतील. उन्हाळ्यात लाइट ऑरेंज, पिंक, लाइट ब्ल्यू, पीच, पॅरट ग्रीन आणि मोव्ह डोळ्यांना जास्त सुखावतात व शरीरातही गारवा देतात. याउलट थंडीत भडक रंगांचे कपडे घातल्यास ते उष्णतेचा आभास देतात.

भारतात सावळ्या रंगाच्या व्यक्ती जास्त आढळतात. गौरवर्णी व्यक्तींना रंगाची निवड करताना जास्त त्रास पडत नाही; परंतु सावळ्या व्यक्तींनी नक्कीच दक्षतेने रंगांची निवड करायला हवी. त्या गडद रंगाची निवड करू शकतात. फिकट रंगांमध्ये पिंक, फिकट क्रीम, पांढरा रंग छान दिसतो. रंगांच्या निवडीविषयी व्यवस्थित माहिती घेऊनच आपण आपले कपडे खरेदी करावेत व परिधान करावेत आणि हास्याचा विषय होणे टाळावे.

## आजच्या काळात अतूट मैत्री शक्य

आधुनिक काळात व्यापार वाढविण्यासाठी मोटारीपासून स्वयंपाकाच्या भांड्यांपर्यंत कोणतीही गोष्ट दोन-पाच वर्षांपेक्षा जास्त काळ टिकणार नाही, अशी खबरदारी घेऊनच बनवली जाते. या ‘यूज अ‍ॅण्ड थ्रो’ (वापरा आण टाकून द्या) या पद्धतीची सवय झाल्यामुळे की काय, माणूस तीच पद्धत मानवी नातेसंबंधांना लागू करतो आहे. ज्यांचा उपयोग असेल त्याच माणसांशी संबंध ठेवायचा, असं नव्या पिढीचं रोखठोक धोरण आहे.

यातून मैत्रीसारखी निर्व्याज भावनाही सुटलेली नाही. साधारणत: मैत्री हे माणसाच्या आयुष्यातलं सर्वांत नि:स्वार्थी आणि म्हणूनच श्रेष्ठ नातं मानलं जातं. भावुक भारतीयांची तर मैत्रीसारखं दुसरं नातं नाही, अशी धारणा दिसते. सहाव्या-सातव्या-आठव्या दशकापर्यंत दोस्तीचे गोडवे गाणारे चित्रपट मोठ्या संख्येने निघायचे. ‘दोस्त’, ‘दोस्ती’ अशीच सिनेमांची नावं असायची. ‘ये दोस्ती हम नही तोडेंगे....तोडेंगे हम मगर तेरा साथ ना छोडेंगे’सारखी गाणी लिहीली जायची.



आत्ताच्या काळात असे चित्रपट आणि गाणी आढळत नाहीच. चित्रपट हे समकालीन परिस्थितीच प्रतिबिंब असतं, हेच खरं. चित्रपटाच नाव दोस्ताना असलं तरी, त्यात दोस्तीची उत्कटता जाणवत नाही. नुसतं मौजमजा करण्यासाठी काही काळ एकत्र येणं, हीच नव्या काळात दोस्तीची एक तऱ्हा झालीय.

दुसऱ्या तऱ्हेत आजचा माणूस फक्त उपयुक्तता लक्षात घेऊन इतरांशी संबंध ठेवतो. त्यांना दोस्तीचं लेबल लावलं जातं; पण ते निव्वळ लेबलच असतं. समोरच्या माणसामुळे आपला काय फायदा होईल, आपला बिझनेस वाढेल का, कॉन्टॅक्ट्स वाढतील का, काही वस्तू स्वस्तात मिळतील का, या गोष्टींचा विचार करून आधुनिक माणूस मैत्री करतो. आपण दुसऱ्याला काय देणार, हा मैत्रीतला पायाभूत विचार तो करीतच नाही. असं का होतं, याचा खुलासा करताना आयटी (माहिती आणि तंत्रज्ञान) क्षेत्रात काम करणारा, २७ वर्षांचा राहूल शिंगरे म्हणतो, ‘तीस-चाळीस वर्षांपूर्वी सामाजिक वातावरण निवांत आणि संस्कारपूर्ण होतं. आज शैक्षणिक आणि कार्यालयीन क्षेत्रं नको इतकी स्पर्धक झाली आहेत. परीक्षेत जास्तीत जास्त टक्केवारी आणि ऑफिसमध्ये लवकरात लवकर प्रमोशन मिळवणं, प्रसिद्धी मिळवणं हेच माणसाचं ध्येय झालं आहे. सख्खी भावंडं आणि पती-पत्नी यांनासुद्धा स्पर्धा चुकत नाही. आजच्या काळात माणसांचे एकमेकांशी चांगले संबंध असू शकतात; पण मैत्री होणं मुश्कील आहे.’

## बेडरूममध्ये कोणत्या प्रकारचे फोटो लावावेत

बेडरूम हे घरातील सर्वात महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे बेडरूमच्या स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जाते. बेडरूममध्ये ठेवण्यात आलेल्या वस्तुंचा प्रभाव पती-पत्नींच्या नातेसंबंधांवर पडत असतो. त्यामुळे वास्तुशास्त्रानुसार बेडरूममध्ये कोणत्या प्रकारचे फोटो लावावेत आणि कोणते लावू नयेत याविषयी काही नियम आहेत. नवरा-बायकोमधील संबंध प्रेमाचे राहण्यासाठी बेडरूममध्ये वास्तुदोष असू नये. शिवाय वास्तुदोष वाढविणारे फोटोही बेडरूममध्ये लावू नयेत. नकारात्मक विचार वाढविणारे फोटो लावू नयेत. देव-देवतांचे फोटो लावणे योग्य नाही. परंतु राधा-कृष्ण यांची मूर्ती किंवा प्रतिमा लावली तरी चालू शकेल. मनाला प्रसन्न वाटेल असे फोटो बेडरूममध्ये लावावेत.

# लग्न झाल्यानंतर बायका नवऱ्यापासून लपवतात 'या' काही गोष्टी

दोन सज्ञान आणि अनुरूप व्यक्तींना एकत्र आणून पवित्र बंधनात बांधणारा सोहळा म्हणजे लग्न. यालाच विवाहबंधन असंही म्हणतात. हे दोन व्यक्तींमधलं सामाजिक आणि धार्मिकदृष्ट्या मान्यताप्राप्त मिलन आहे. सामंजस्य, पारदर्शकता आणि विश्वास हा या नात्याचा पाया मानला जातो.

सहजीवनाच्या आनंदासाठी दोन व्यक्ती एकत्र येतात, तेव्हा त्यांचं नातं कसं असावं याविषयी काही अलिखित सामाजिक संकेत आहेत. म्हणजेच लग्न केलेल्या दोघांनी एकमेकांसोबत राहताना त्यांच्यात सामंजस्य, प्रेम आणि विश्वास असावा, त्यांच्या नात्यात पारदर्शकता असावी, एकमेकांपासून काहीही लपवू नये असे ते समाजमान्य संकेत असतात. मात्र परस्परविश्वासाला तडा जातो जेव्हा दोघांमधली एक व्यक्ती काहीतरी लपवू लागते. ही गोष्ट बरेचदा स्त्रियांमध्ये पाहायला मिळते. अनेकवेळा कळत-नकळतपणे या बायका आपल्या नवऱ्यापासून त्यांच्या भावना, निर्णय किंवा इतर काही गोष्टी लपवू लागतात. किंवा त्यांना त्या लपवाव्याशा वाटतात. बायकांच्या अशा कोड्यात टाकणाऱ्या वागण्यामागे अनेक कारणं असतात. ती काय असतात आणि बायका अशा का वागतात, यांची चर्चा आज आपण इथे करू या.



**पूर्वीची नाती**

अनेकदा बायका त्यांच्या आधी होऊन गेलेल्या नात्याविषयी बोलणं टाळतात. अर्थातच आपल्या नवऱ्याचा काही गैरसमज होऊ नये हाच त्यामागचा त्यांचा विचार असतो. दोघांमध्ये निष्कारण वाद नकोत, ही त्यामागची त्यांची भूमिका असते. पूर्वीच्या नात्याबद्दल सांगितलं तर न जाणो नवऱ्याचा अहंकार दुखावाला जाईल की काय अशीही रास्त शंका त्यांच्या मनात असते.

**भावनिक गोंधळ**

अनेकदा स्त्रिया त्यांच्या मनात चाललेल्या भावनिक त्रेधातिरपीटीविषयी सांगत नाहीत. गोष्टी मनातच ठेवतात. उदा. लग्नानंतर अंगावर पडलेली कौटुंबिक जबाबदारी, रोजच्या घरकाम आणि त्यांच्या प्रोफेशनल आयुष्याचा समतोल साधताना त्यांची होणारी तारांबळ याविषयी त्या बोलत नाहीत. अर्थात न सांगण्याचं कारण म्हणजे त्यांना असं वाटत असतं की आपले प्रश्न आपण स्वतः सोडवले पाहिजेत. नवऱ्याला आपल्यामुळे त्रास होता कामा नये.

**स्वतःची आर्थिक स्थिती**

आर्थिक निर्णय, बचत किंवा इतर गुंतवणूक याबाबत स्त्रिया आपल्या नवऱ्याला संगत नाहीत. त्यांना स्वतःचा असा एक आर्थिक उत्पन्नाचा स्वतंत्र आणि गोपनीय स्त्रोत हवा असतो. आपलं आर्थिक स्वातंत्र्य आणि त्याच्या जोरावर घेता येणारे निर्णय हे त्यांना अबाधित ठेवायचे असतात. अनपेक्षित प्रसंगी पैशांची गरज लागेल तेव्हा त्या प्रसंगांसाठी स्त्रिया पैसे साठवून ठेवतात.

**कौटुंबिक बाबतीत मत**

काही स्त्रिया लग्न झाल्यावर माहेरच्या काही समस्या असतील तर त्या नवऱ्याशी शेअर करत नाहीत. नवऱ्याला अशा प्रश्नावर मार्ग शोधायला सांगण्याऐवजी स्वतःच त्यावर उत्तर शोधतात. हा मुद्दा त्यांच्या स्वाभिमानशी निगडीत आहे.

**स्वप्नं आणि इच्छा**

बहुतांश स्त्रिया आपल्या वैयक्तिक आवडी-निवडी, हौस, छंद याविषयी नवऱ्याला काही सांगत नाहीत. असं करण्यामागे त्यांच्या मनात असलेली असुरक्षिततेची भावना प्रबळ ठरते. आपल्या इच्छा आणि स्वप्नं यांचा मान ठेवला गेला नाही तर त्या नाउमेद होऊ शकतात. म्हणूनच अपेक्षाभंगाचं दुःख वाट्याला येऊ नये म्हणू त्या याही बाबतीत गप्प राहतात.

# शाकाहारामुळे मानवाचे आरोग्य राहते उत्तम



तुम्ही शाकाहारी असलात, तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. हृदयविकार, मधुमेह, कर्करोग यांसारखे आजार शाकाहारामुळे टाळता येतात, असे एका संशोधनात स्पष्ट झाले आहे. अमेरिकेतील विन्सट क्रेग आणि रिड मँजेल्स या प्राध्यापकांनी केलेल्या संशोधनातून वरील निष्कर्ष काढले आहेत.

शाकाहारामुळे आरोग्य चांगले राहणण्यास मदत होते. कोलेस्टेरॉलची पातळी कमी होते. हृदयविकाराची शक्यता कमी होते, अतिरिक्त आणि कमी रक्तदाबावर नियंत्रण राहते, असे निष्कर्ष या दोन प्राध्यापकांनी काढले आहेत. याबाबत माहिती देताना प्रा.क्रेग म्हणाले, 'शाकाहारामुळे मानवाचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. शाकाहारी व्यक्तींच्या शरीराची चाचणी घेतली असता त्यांच्या कर्करोगाचे प्रमाण कमी असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच दोन्ही प्रकारचा मधुमेह नियंत्रित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे.

हेच प्रमाण मांसाहार करणाऱ्यांत अधिक आढळते. शाकाहारामुळे शरीराच्या आरोग्याचे योग्य प्रकारे नियंत्रण राहते. शाकाहारी व्यक्तीत कोलेस्टेरॉल आणि प्रथिनांची पातळी नियंत्रणात असल्याचे निष्कर्ष आम्हाला मिळाले आहेत. नैसर्गिकरित्या पोषण होत असल्याने शाकाहारी व्यक्तीत रोग होण्याचे प्रमाण कमी असते. तसेच शाकाहार हा निसर्गाशी जास्त जवळचा असल्याने माणसाच्या शरीरातील पाच प्राणतत्त्वांचे संतुलन राहण्यासही मदत होते.' क्रेग यांच्या या निष्कर्षांचा अहवाल अमेरिकन डाएटेशियन जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आहे.

# डायनासोर बद्दल थोडसं...

विशालकाय डायनासोरबद्दल आतापर्यंत वेगवेगळ्या माध्यमांतून वेगवेगळ्या प्रकारची माहिती प्रसिध्द झाली आहे. तथापि, हे डायनासोर पृथ्वीवरुन नाहीसे कसे झाले याविषयी अद्याप ठोस माहिती आलेली नाही. यासंदर्भात अनेक तर्क-वितर्क लढवले जात असतानाच आता लंडनमधील शास्त्रज्ञांनी एक वेगळाच दावा केला आहे.

एका प्रचंड आकाराच्या ताऱ्यामुळे डायनासोरचा नाश झाला असावा, असे या शास्त्रज्ञांनी म्हटले आहे. या ताऱ्याचा आकार सध्याच्या सौरमंडळातील सर्वात मोठा ग्रह असणाऱ्या गुरुपेक्षाही पाच पटीने अधिक होता, असे या संशोधकांनी म्हटले आहे.

वैज्ञानिकांनी या ताऱ्याचे नाव नेमिसिस असे ठेवले आहे. नेमेसिस म्हणजे विनाशाची देवी. या वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार नेमेसिससारखे तारे हे अदृश्य असतात. कारण त्यांच्यामधून फक्त अतीनील किरण (इन्फ्रारेड) निघत असतात. हा तारा आपल्या सौरमंडलाच्या कक्षेबाहेरचा आहे. सूर्य आणि पृथ्वी यांच्यातील असणाऱ्या अंतराच्या २५ पट इतके हे अंतर आहे. असे असूनही या ताऱ्यापासून आपल्या ग्रहांना धोक आहे, असे वैज्ञानिकांनी म्हटले आहे.

आपल्या सौरकक्षेच्या बाहेर उर्ट क्लाउड नावाचा बर्फ आणि दगडाचा एक मोठा परिसर आहे. याठिकाणी बर्फाच्या स्वरुपातील उल्कापिंडांचे भांडारच आहे. सौरकक्षेतून फिरताना नेमेसिससारखे मोठे तारे या उल्कापिंडांना आपल्याकडे खेचून घेतात. दरम्यान डायनासोरला नष्ट करणाऱ्या या नेमेसिसचा शोध घेण्याचा विडा नासाच्या संशोधकांनी उचलला आहे. त्यासाठी त्यांनी यावर्षीच्या १ जानेवारीपासून संशोधनाला सुरुवातही केली आहे.

# उन्हाळ्यात ताक का प्यावे? वाचा, एकापेक्षा एक तगडे फायदे

उन्हाळ्यात शरीराला पाण्याची सर्वात जास्त आवश्यकता असते. उष्णतेमुळे शरीरात पाण्याची कमतरता जाणवते आणि शरीर थकलेले असते. जेव्हा तुम्हाला घाम येतो, तेव्हा आपले हात थंड पाण्याच्या बाटलीकडे जातात. अशावेळी पाण्याबरोबर तुम्ही एक ग्लास ताक सुद्धा पिऊ शकता. ताक हे तुमच्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर ठरू शकते आणि तुम्हाला ताजेतवाने ठेवू शकते. ताकाच्या सेवनाचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत.

**डिहायड्रेशन दूर करते :** अति उष्णतेमुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होते अशा परिस्थितीत शरीर हायड्रेटेड ठेवणे गरजेचे आहे. जर तुम्हाला डिहायड्रेशन होत असेल तर उन्हाळ्याच्या दिवसात एक ग्लास ताक तुम्हाला ऊर्जा देऊ शकते आणि तुमचा थकवा दूर करू शकते.



**शरीर थंड ठेवते**

थंड द्रव पदार्थ प्यायल्याने शरीराला थंडावा मिळतो. उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी ताक हा एक उत्तम पर्याय आहे. ताकामध्ये शरीराला थंडावा देणारे गुणधर्म आहे जे शरीराचे तापमान कमी करू शकतात. मेनोपॉज आलेल्या महिलांसाठी ताक हे अतिशय फायदेशीर आहे.

**बद्धकोष्ठता दूर करते**

दररोज सकाळी उपाशी पोटी ताक प्यायल्याने बद्धकोष्ठता दूर होते आणि पोटाचे आजार सुद्धा दूर होतात. पोट फुगण्याचा त्रास कमी होतो.

**आतड्यांचे आरोग्य चांगले राहते**

दह्यामध्ये चांगले प्रोबायोटिक गुणधर्म आहेत आणि ताक हे दह्यापासून बनवले जाते जे पचनक्रियेत चांगले बॅक्टेरिया वाढवण्याचे काम करते. निरोगी पचनसंस्थमुळे रोगप्रतिकारक शक्ती आणि व्यक्तीच्या एकूण आरोग्य उत्तम राहते.

**वजन कमी करण्यास मदत करते**

अनेक जण वजन कमी करताना दुग्धजन्य पदार्थांचे सेवन करणे टाळतात. ताकात फॅटशिवाय दुधात असलेले सर्व पोषक घटक असतात. एक ग्लास ताकामुळे तुम्हाला बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटेल. जर तुमचे ध्येय कॅलरीज कमी करायचे असेल तर ताक हे एक उत्तम पेय आहे.

**निरोगी त्वचा**

ताकामध्ये अल्फा हायड्रॉलिक ॲसिड आणि लॅक्टिक ॲसिड असते जे तुमच्या त्वचेला उन्हापासून संरक्षण देते. उष्णतेमुळे तुमची त्वचा निस्तेज व तेलकट होऊ शकते पण एक ग्लास थंडगार ताक तुमच्या त्वचेसाठी फायदेशीर ठरू शकतो.

# कामाच्या ठिकाणा 'या' गोष्टींना 'नन्ना'चा पाढा वाचू नये

ऑफिसमध्ये काम करताना प्रत्येकाने स्वतःच्या प्रतिमेला तडा जाऊ नये, यासाठी काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणा पुढील १० गोष्टींना 'नन्ना'चा पाढा वाचू नये. ऑफिसमध्ये त्यांना 'बॅन' आहे, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**'ते' माझे काम नाही :** सहकाऱ्याने तुमची मदत मागितली, तर ती तुमच्या कार्यक्षमतेला मिळालेली दाद समजा व त्याला जास्त मदत करा, 'ते'माझे काम नाही, असे मुळीच म्हणून नका. त्यामुळे ऑफिसमधील वातावरण चांगले राहाण्यास मदत होईल.

**तुला मदत करण्यास हरकत नाही :**

एखादी जबाबदारी तुम्ही आनंदाने स्वीकारली, मात्र प्रत्यक्षात ते काम करण्याची तुमची इच्छा नसेल, तर त्याचा अर्थ मदत करण्यास नकार देण्यासारखाच आहे. तसेच जर काम पूर्ण करण्याचा तुमचा हेतू नसेल, तर तुम्ही काहीतरी करणार आहात असे म्हणू नका.

**मी असं म्हणलो होता; परंतु... !** असे कोणाला सांगू नका : मी असं म्हणालो होतो; परंतु.. या वाक्याचा एकच अर्थ आहे की, तुमचे ज्ञान जगाला सांगण्यासाठी तुम्हाला कोणाचीतरी गरज आहे. जर ते खरोखरच गोपनीय असेल, तर तुमच्याजवळच ठेवा.

**मला 'वाढ' मिळाली नाही..**

बहुसंख्य मालक हे उत्पादकतेशी निगडीत वेतनवाढ देतात. तुम्ही किती वर्षे काम करीत आहात, यावर वेतनवाढ नसते. तुम्हाला तुमच्या गुणवत्तेत वाढ करुन तुमचे नाणे खणखणीत आहे, हे दाखवून द्यावे लागेल.

**कामाचा खूप ताण :** मला भरपूर काम पडते, खूप ताण आहे किंवा कंपनी तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांमध्ये लोकप्रिय होऊ देत नाही, अशा प्रकाऱ्या तक्रारी वारंवार करु का. जर तुम्हाला कंपनीची धोरणे अमान्य असतील, तर कार्यालयीन यंत्रणेकडे तुमची मते व्यक्त करा.



**तब्येतीची रडगाणे गाऊ नका :**

तुमचे डोके दुखणे, तुम्हाला अन्य शारीरिक वेदना होणे, यांच्याशी कोणालाही देणे घेणे नसते. तुमच्या आरोग्याच्या तक्रारी म्हणजे मालकाच्या दृष्टीने 'जोखमीचा कर्मचारी' असतो, हे विसरु नका.

**मला 'त्यासाठी' वेळ नाही :** जर तुमच्या बॉसने तुम्हाला एखादी गोष्ट करण्यास सांगितली, तर ते काम करण्याशिवाय तुमच्यापुढे कोणताही पर्याय नसतो. तर तुमच्याकडे आधी सोपवलेले काम पूर्ण करण्याची जबाबदारी असेल, तर प्रामाणिकपणे तसे बॉसले सांगावे. तुमच्या कामाचे शेड्यूल्ड किती टाईट आहे, हे त्यांना सांगावे. म्हणजे तुमच्या कृतीतील प्रामाणिकपणा त्यांना जाणवेल. मात्र त्या कामासाठी वेळ नाही, असे कदापीही म्हणून नका.

**घड्याळावर बोट नको :** कामावर येताना वेळेवर येणे आवश्यक आहे, मात्र घरी जाताना घड्यावर बोट ठेवू नये. हातातले काम पूर्ण केल्याशिवाय जाऊ नये. घरच्या घाईघाईत काम पूर्ण करण्याच्या नादात चुका होऊ शकतात, हे विसरु नये.

**रात्री खूप चढली :** तुमच्या सवयीची बॉसपढे बढाई मारु नका. अशा बढाईमुळे बॉस तुमच्यावर खूष होईल, अशा भ्रमात राहू नका. दारु पिऊन कामावर येऊ नका.

**बॉसला २० हजारांचे घड्याळ भेट दिले.**

बॉसला भेटवस्तू देण्यासाठी तुम्ही किती रुपये खर्च केले, त्यांना मेजवानी देण्यासाठी किती रुपये उधळले याची चचा मित्रमंडळींमध्ये करु नका. तुम्ही नुसती बढाई मारता आहात, असाच सर्वांचा समज होईल तुमचा पगार व राहणीमान यावरुन तर्कवितर्क लढविले जातील. तशी संधी इतरांना देऊ नका.

■■■


# उन्हाळ्यात दररोज केस धुवून कंटाळा आलाय? मग घरच्या घरी करा 'हा' सोपा उपाय

## केस अजिबात चिकट होणार नाहीत

खरं तर रोज केसांना शांपू करणं योग्य नाही; पण कधी कधी केसांमध्ये इतका मळ आणि चिकटपणा निर्माण होतो की, केस न धुता बाहेर जाणं शक्यच होत नाही. अशा वेळी तुमचं आवडतं स्किनकेअर प्रोडक्ट - मायसेलर वॉटर - तुमच्या या अडचणीवर उत्तर ठरू शकतं.

मायसेलर वॉटर हे सौम्य क्लीन्सर आहे, जे मायसेल्स नावाच्या लहान रेणूंच्या गटांपासून बनवलं जातं. हे मायसेल्स तेलाला चिकटतात आणि त्यामुळे त्वचेवरील मेकअप व घाण सहज साफ होते. त्याचबरोबर त्वचा ओलसरही राहते. हे मायसेलर वॉटर चेहरा धुण्याशिवाय किंवा घासल्याशिवाय त्वचा स्वच्छ करण्याचा एक सोपा उपाय आहे.

पण, हे स्किन क्लीन्सर ड्राय शांपूसारखे कसे वापरता येईल? जसं ते चेहरा स्वच्छ करतं, तसेच त्यात असलेले मायसेल्स केसांमधली घाण आणि तेल शोषून घेतात; पण केसांमधलं नैसर्गिक तेल काढून टाकत नाहीत. हे टाळू आणि केस ताजेतवाने ठेवायला मदत करतं आणि कुठलाही चिकटपणा किंवा थर शिल्लक ठेवत नाही.



हा केस स्वच्छ करण्याचा एक सौम्य आणि प्रभावी उपाय आहे, विशेषतः ज्यांची टाळू संवेदनशील आहे किंवा जे पर्यावरणपूरक पर्याय शोधत आहेत त्यांच्यासाठी. जरी हा उपाय पारंपरिक शांपूला पूर्णपणे बदलू शकत नसला तरी हा केसांच्या देखभालीच्या दिनक्रमामध्ये एक उपयुक्त जोड ठरू शकतो, असं डॉ. सोनाली कोहली यांनी (सल्लागार त्वचारोगतज्ज्ञ, सर एच. एन. रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल, मुंबई) स्पष्ट केलं.

**कसं वापरायचं?**

मायसेलर वॉटर ड्राय शांपू म्हणून वापरायचं असल्यास, ते कॉटन पॅडवर घेऊन टाळूवरच्या तेलकट भागांवर हलकं हलकं लावावं. हा उपाय जास्त तेल शोषून घेण्यास मदत करतो आणि केस स्वच्छ व हलके वाटू लागतात, असं डॉ. कोहली म्हणाल्या. पण, हे लक्षात ठेवायला हवं की, मायसेलर वॉटर केस थोडेफार साफ करण्यासाठी छान आहे. मात्र फार जड तेल किंवा जास्त मळ साफ करण्यात ते तितकं प्रभावी नसू शकतं.

मायसेलर वॉटर ड्राय शांपू म्हणून वापरण्याचे फायदे काय आहेत?

डॉ. कोहली यांनी केसांसाठी मायसेलर वॉटरचे खालील फायदे सांगितले:

**जेंटल क्लिन्जिंग :** मायसेलर वॉटरमध्ये माईल्ड साफ करणारे घटक असतात, त्यामुळे हे संवेदनशील टाळूसाठी योग्य आहेत. हे केसांवर जमा झालेला प्रेडक्टचा थर साफ करतं आणि केस ताजे ठेवतं.

**कोरडेपणा न आणणारे** (Non Dehydrating) : काही पारंपरिक शांपूप्रमाणे हे केसांतील नैसर्गिक तेल काढून टाकत नाही. त्यामुळे केस ओलसर आणि मॅनेजेबल राहतात.

**सर्व प्रकारच्या केसांसाठी योग्य :** हे पातळ, तेलकट किंवा कुरळ्या केसांवर वापरता येतं. केसांना वॉल्युम देतं आणि जास्त तेल काढून टाकतं.**पर्यावरणपूरक :** पारंपरिक शांपूच्या तुलनेत मायसेलर वॉटर कमी पाण्यात वापरता येतं, त्यामुळे ते अधिक टिकाऊ पर्याय आहे.

# लिपस्टिक वापरण्यापूर्वी...

गुलाब पाकळ्यांप्रमाणे गुलाबी ओठ कोणाला आवडणार नाहीत. आपणही आपले ओठ असे सुंदर व नाजूक राखू इच्छित असाल, तर आपल्याला ओठांची योग्य देखभाल करायला हवी. आपले गुलाबी ओठ कायमचे गुलाबी राखण्यासाठी वेगळा वेळ द्यायला हवा.

**क्लीनिंग –** प्रथम कोल्ड क्रीम वा क्रिमी क्लींजरने ओठ साफ करा. लिप्स क्लींजर घरीही बनवू शकता. चमचाभर खोबरेल तेलात जोजोबा नट तेल मिसळा व ओठांवर लावा. थोड्या वेळाने ओल्या कापसाने स्वच्छ करा. जर ओठ जास्त रूक्ष असतील, तर दहा थेंब बदामाचे तेल, एक टेबलस्पून व्हिटॅमिन ई क्रीम व पाव चमचा व्हाइट पेट्रोलियम जेली मिक्स करून सकाळ-संध्याकाळ लावा. ही फ्रीजमध्ये स्टोअरही करू शकता.

**मॉइश्चरायझर –** रोज मॉइश्चरायझरसाठी उत्तम प्रतीचे क्रीम लावा. हे धूळ-मातीपासून ओठांचे रक्षण करील. रात्री झोपताना जोजोबा ऑइल लावावे. हे त्वचा चटकन शोषते व ओठ कोमल होतात.

**डेडस्किन –** रोज मॉइश्चरायझर लावल्यामुळे त्वचेचे रक्षण, तर होतेच शिवाय डेड स्कीन जाते. यासाठी आपला टूथब्रश गरम पाण्यात बुडवून थोडा मऊ करावा व त्यावर स्क्रब पेस्ट घेऊन ओठांचा मसाज करावा. अशाप्रकारे डेडस्किन निघून जाईल. यानंतर त्वरित मॉइश्चरायझर लावावे.

**उन्हापासून रक्षण –** लिपस्टिक वापरण्यापूर्वी त्यात यूव्हीए व यूव्हीबी प्रोटेक्शन आहे की नाही हे पाहून घ्यावे. ओठात अत्यंत कमी मेलेनियम असल्यामुळे ते उन्हाने लवकर खराब होतात. एक टेबलस्पून ॲण्टी टॅन फेड पॅक, एक स्पून कोकोनट मिल्क व एक स्पून टोमॅटो ज्यूस मिक्स करून ते १५ मिनिटे लावून धुवा व नंतर मॉइश्चरायझर लावा.

**डार्क लिप्स –** नेहमी ब्रॅण्डेड लिपस्टिकच लावावी. झोपण्यापूर्वी ती हटवावी. बाहेर जाण्यापूर्वी लिपजेल अवश्य लावावे जर फटी पडल्या असतील, तर पेट्रोलियम जेली लावा.

## छान छान

# लोहार आणि फुकटखाऊ सरदार

एका लोहाराने एका फुकट्या सरदाराला चिलखत फुकट दिले नाही, म्हणून त्या सरदाराने चिडून त्या लोहाराविरूध्द बादशहाचे मन कलुषित केले.

चारदोन दिवसांनी तो लोहार एक चिलखत घेऊन बादशहाकडे गेला असता, त्या फुकटखाऊ सरदाराच्या सांगण्यानुसार बादशहा त्या लोहाराला म्हणाला,

तू ते चिलखत जमिनीवर ठेव. मी त्यावर तरवारीचा घाव घालतो. ते चिलखत जर टिकले तर खरेदी करीन, नाहीतर यापुढे तुझ्याकडून कधीही चिलखते खरीदणार नाही. याप्रमाणे बोलून, बादशहाने म्यानातून बाहेर काढलेल्या तरवारीने त्या लोहाराने जमिनीवर ठेवलेल्या चिलखतावर जोराने प्रहार केला. त्याबरोबर त्या चिलखताचे दोन तुकडे झाले. ते पाहून बादशहाने त्याला हाकलून लावले. त्या लोहाराचे पोट बादशहाने आपल्या सैनिकांसाठी त्याच्याकडून घेत असलेल्या चिलखतांतून मिळणाऱ्या उत्पन्नावरच भरत असल्यामुळे, तो लोहार दुःखी झाला व बिरबलाकडे जाऊन त्याने तो प्रकार त्याच्या कानी घातला. बिरबलाने त्याला पुढे काय करायचे ते सांगितले व त्याला परत पाठवले. बिरबलाच्या सांगण्यानुसार तो लोहार दुसऱ्या दिवशी दुसरे एक चिलखत घेऊन दरबारात गेला व बादशहाला मुजरा झाडून म्हणाला,मायबाप, मी स्पष्ट शब्दात बोलत आहे. त्याबद्दल मला क्षमा करा. एका फुकटखाऊ सरदाराने माझ्यासारख्या गरिबाकडे फुकट चिलखत मागितले आणि त्याला मी तसे देण्याचे नाकारले म्हणून त्याने मी बनवलेली चिलखते कमकुवत असतात असे सर्वांना सांगून सर्वांचे मन माझ्याविरूध्द कलुषित केले. चिलखते ही जमिनीचे रक्षण करीत नसतात. ती माणसांचे रक्षण करण्यासाठी बनविली जातात. तेव्हा मी आता हे नव्याने आणलेले चिलखत माझ्या अंगावर चढवतो आणि आपल्याला माझ्या अंगावर तरवारीचे कितीही वार करण्याची विनंती करतो. आपल्या तरवारीच्या वारांनी मला जर काही दुखापत झाली, तर आपण यापुढे माझ्याकडून कधीही चिलखते घेऊ नये.

बादशहाने ही गोष्ट मान्य केली. मग त्या लोहाराने ते चिलखत स्वतःच्या अंगावर चढविले व बादशहाने त्यावर तरवारीचे तीन-चार वार केले, पण त्यामुळे त्या लोहाराला यत्किंचितही इजे पोहोचली नाही तेव्हा बादशहाने त्याला आदल्या दिवशीच्या तुटलेल्या व नव्या, अशा दोन्हीही चिलखतांचे वाजवीपेक्षा अधिक पैसे दिले आणि यापुढेही तुझ्याचकडून चिलखते घेतली जातील, असे त्याला आश्वासप दिले.

या प्रकारामुळे त्या फुकटखाऊ सरदाराचे तोंड मात्र अगदी बघण्यासारखे झाले.


## पाहिजेत

सर्वोद्य शिक्षण संस्था रावणगाव,ता.दौंड,जि.पुणे ४१३१३० पवित्र प्रणालीद्वारे शिक्षण **सेवक भरती जाहिरात (टप्पा २)** सर्वोद्य शिक्षण संस्था, रावणगाव ता.दौंड, जि.पुणे (संस्था कोड **272504SC010**) या व्यवस्थापनाच्या **सरस्वती विद्यालय रावणगाव, ता.दौंड, जि.पुणे** या माध्यमिक विद्यालयात पवित्र प्रणालीव्दारे (१००%) अनुदानित **शिक्षण सेवक** नेमणे आहोत. पदांची संख्या, विषय, माध्यम, मानधन, आरक्षण इत्यादी माहिती **https://tait2022.mahatea cherrecruitment.org.in** शासनाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्हता प्राप्त उमेदवारांनी समक्ष अधिकारी यांनी निर्धारित केलेल्या मुदतीत पवित्र पोर्टलवर आपले पसंतीक्रम नोंदविणे आवश्यक आहे.

मुलाखतीचा पत्ता :- सरस्वती विद्यालय रावणगाव ता. दौंड, जि. पुणे
मो. ९८५०२९६३२९, ८९७५३०००३१

सचिव
सर्वोद्य शिक्षण संस्था इ ३८० / १९६७
मु.पो. रावणगाव ता. दौंड, जि. पुणे

## कला विश्व




### ‘हाऊसफुल ५ ‘चा धमाकेदार टीझर; फक्त कॉमेडी नाही तर किलर कॉमेडी दिसणार

काही दिवसांपासून एकापेक्षा एक चित्रपट प्रदर्शित आहेत. त्यामध्ये जाट, ग्राउंड झिरो, केसरी २ अशा चित्रपटांचा समावेश आहे. या सगळ्यात आता प्रेक्षक ज्या चित्रपटाची आतुरतेने वाट बघत होते, त्या चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

हाऊसफुल ५ या चित्रपटाची निर्मिती साजिद नाडियादवाला यांनी केली असून, तरुण मनसुखानी यांनी दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाच्या टीझरला नुकतेच सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनने ‘U- १६+’ रेटिंग दिले आहे.

आता या चित्रपटाचा धमाकेदार टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या टीझरच्या सुरुवातीला अक्षय कुमार, रितेश देशमुख, अभिषेक बच्चन यांचे वेगवेगळे हावभाव दिसत आहेत. तसेच, नाना पाटेकरांचा एक वेगळा अंदाज पाहायला मिळत आहे. टीझरमध्ये पुढे एक खून होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे आता कोणाचा खून होणार, त्यामुळे काय परिस्थिती निर्माण होणार हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे. तसेच, कोणते कलाकार कोणत्या भूमिकात दिसणार आणि ते एकत्र कसे येणार, हे पाहण्याचीदेखील प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता आहे. याआधी हाऊसफुल फ्रँचायझीचे चार चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. चारही चित्रपटांनी धुमाकूळ घातल्याचे पाहायला मिळाले. प्रत्येक चित्रपटाने प्रेक्षकांचे मोठे मनोरंजन केले. त्यामुळे ‘हाऊसफुल ५’ची गोष्ट पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

रितेश देशमुखने सोशल मीडियावर हा टीझर शेअर केला आहे. हा टीझर शेअर करताना त्याने लिहिले, आजच्या दिवशी १५ वर्षांपूर्वी वेडेपणा सुरू झाला होता. भारतातील सर्वांत मोठी फ्रँचायजी पाचव्या भागासह परतली आहे. यावेळी फक्त गोंधळ आणि कॉमेडी नाही, तर किलर कॉमेडी पाहायला मिळणार आहे.

‘हाऊसफुल ५’मध्ये अभिषेक बच्चन , रितेश देशमुख, संजय दत्त, फरदीन खान, जॅकलिन फर्नांडिस, नर्गीस फाखरी, डिनो मोरिया, जॅकी श्रॉफ, नाना पाटेकर, श्रेयस तळपदे, जॅकलिन फर्नांडिस हे कलाकार आहेत. तसेच, चित्रांगदा सिंग, सौंदर्या शर्मा, रणजित आणि आकाशदीप साबीर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

दरम्यान, हा चित्रपट ६ जून २०२५ ला प्रदर्शित होणार आहे. त्याबरोबरच, चित्रपटगृहांत प्रदर्शित झाल्यानंतर हाऊसफुल ५ हा ॲमेझॉन प्राइम व्हिडीओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवरही प्रदर्शित होणार आहे. अक्षय कुमार नुकताच ‘केसरी २’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. त्याच्या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. तर, रितेश देशमुख लवकरच ‘रेड २’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तो अजय देवगणसह प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. आता ‘हाऊसफुल ५’मध्ये अनेक लोकप्रिय कलाकार एकत्र दिसणार आहेत.



### अजय देवगण-रितेश देशमुखच्या ‘रेड २’ने ॲडव्हान्स बुकिंगमध्ये केली कोटींची कमाई

सध्या बॉक्स ऑफिसवर ‘सिकंदर’, ‘जाट’, ‘केसरी चॅप्टर २’, ‘फुले’, ‘ग्राउंड झिरो’ या चित्रपटांचा बोलबोला सुरू आहे. पण, या चित्रपटांना पाहिजे तसा प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत नाहीये. त्यामुळे अजय देवगण आणि रितेश देशमुखच्या ‘रेड २’ चित्रपटाकडून अपेक्षा वाढल्या आहेत. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळू शकतो, असा अंदाज लावला जात आहे. कारण ॲडव्हान्स बुकिंग जोरदार सुरू आहे.

‘रेड २’ चित्रपट १ मेला प्रदर्शित होणार आहे. त्याआधी ॲडव्हान्स बुकिंगला सुरुवात झाली असून गेल्या २४ तासांत ११६ टक्क्यांच्या वेगाने तिकीट विक्री होतं आहे. ॲडव्हान्स बुकिंगमध्ये मिळत असलेल्या हा वेगवान प्रतिसाद पाहून पहिल्या दिवशी ‘रेड २’ चित्रपट चांगली कमाई करणार असल्याचं म्हटलं जात आहे. सॅकनिल्कने दिलेल्या माहितीनुसार, आज ५,२९५ शोसाठी प्री-सेल्स बुकिंग होतं आहे. सोमवारी ही संख्या ३,९६८ होती. शनिवारी ॲडव्हान्स बुकिंग सुरू झाल्यानंतर २४ तासांत ‘रेड २’ चित्रपटाची ४५.१६ लाखांची तिकीट विक्री झाली. तेव्हा देशभरात फक्त २,३३८ शोसाठी १३ हजारांहून तिकिटं विकली गेली होती. सोमवारी हा आकडा २९,७१५ झाला. आज सकाळपर्यंत ‘रेड २’ चित्रपटाची ६४, ३०० तिकीट विक्री झाली आहेत.

ॲडव्हान्स बुकिंगमधून अजय देवगण-रितेश देशमुखच्या या चित्रपटाने १.८३ कोटींची कमाई केली आहे. देशातील काही राज्यांमध्ये ‘रेड २’ चित्रपटाची क्रेझ अधिक पाहायला मिळत आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र, दिल्ली-एनसीआर, गुजरात, हैदाराबाद, बिहार, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या राज्यांचा समावेश आहे. ॲडव्हान्स बुकिंगचा प्रतिसाद पाहून ‘रेड २’ चित्रपट पहिल्या दिवशी १०-१२ कोटींची कमाई करेल, असं म्हटलं जातं आहे. तसंच पुढील २४ तासांमध्ये ॲडव्हान्स बुकिंग अधिक वेगाने झाले तर चित्रपट पहिल्या दिवशी १५ कोटींपर्यंत कलेक्शन करू शकतो, असाही अंदाज लावला जात आहे.

दरम्यान, ‘रेड २’ चित्रपटाच्या निर्मितीची धुरा भूषण कुमार, अभिषेक पाठक, कृष्ण कुमार आणि गौरव नंदा यांनी सांभाळली आहे. तसंच राज कुमार गुप्ता यांनी दिग्दर्शन केलं आहे. या चित्रपटात अजय देवगण, रितेश देशमुख, वाणी कपूर व्यतिरिक्त रजत कपूर, सौरभ शुक्ला, सुप्रिया पाठक आणि अमित सियाला महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. ‘रेड २’ चित्रपटात पुन्हा एकदा भ्रष्टाचाराची कथा पाहायला मिळणार आहे.

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समस्या सोडवण्यासाठी सर्वतोपरी मदत करणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राज्यात विविध इमारतींची कामे सुरु असून ही कामे पुढील पन्नास वर्षांचा विचार करुन दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आज दिल्या. तसेच वक्फ मंडळासमोरील समस्या सोडवण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासनही दिले.

राज्य वक्फ मंडळाशी संबंधित विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयातील उपमुख्यमंत्र्यांच्या समिती कक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन (दूरदृश्य प्रणालीद्वारे), छत्रपती संभाजीनगर येथील वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी, मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद तसेच विभागाचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



राज्यातील मुस्लिम बांधवांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य सेवा व इतर आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी सरकार कटिबद्ध आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाच्या गरजा लक्षात घेऊन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. समाजातील युवकांना रोजगाराभिमुख शिक्षण व प्रशिक्षण मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील असे सांगितले.

या बैठकीत वक्फ मंडळाच्या संपत्ती व्यवस्थापन, निधी वितरण, शिक्षण व इमारत प्रकल्पांशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित विभागांना कार्यवाहीसाठी सूचना देत वक्फ मंडळाच्या समस्या दूर करण्यासाठी सकारात्मक असल्याचे सांगितले.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्यावतीने ठाण्यात भव्य आरोग्य शिबिर संपन्न

### एकाच दिवशी तब्बल २ हजार रुग्णांची घेतला आरोग्य सेवेचा लाभ

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्यावतीने ठाणे येथील एम. एच. हायस्कूलच्या परिसरात भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा लाभ तब्बल २,००० नागरिकांनी घेतल्याची माहिती कक्षप्रमुख श्री. रामेश्वर नाईक यांनी दिली.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच आमदार ड. निरंजन डावखरे यांच्या विशेष प्रयत्नांनी या शिबिराचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले. या शिबिरात २९५ वैद्यकीय कर्मचारी, यामध्ये डॉक्टर,



परिचारिका, फार्मासिस्ट तसेच १०० स्वयंसेवकांनी अत्यंत समर्पितपणे सेवा दिली. हृदयरोग, त्वचारोग, कान-नाक-घसा, बालरोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, दंतचिकित्सा, नेत्ररोग, सामान्य वैद्यकीय सेवा (जनरल सर्जन), आयुर्वेद व होमिओपॅथी अशा विविध तज्ज्ञांकडून नागरिकांना विनामूल्य वैद्यकीय सेवा देण्यात आल्या.

शिबिरात ईएनटी (कान-घसा-नाक) व नेत्ररोग विभागातील सेवेचा रुग्णांनी सर्वाधिक लाभ घेतल्याचे पहायला मिळाले. तज्ज्ञांनी केलेल्या तपासणीनंतर २१२ रुग्णांना पुढील उपचारासाठी उच्च दर्जाच्या रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरासाठी २ रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या. शिबिरादरम्यान रक्त व लघवी तपासणी, ईसीजी चाचणी, आयुष्मान भारत कार्ड नोंदणी यासारख्या सेवा देखील पूर्णतः मोफत देण्यात आल्या.

तपासणीच्या अनुषंगाने काही रुग्णांवर आवश्यक त्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.

राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष सातत्याने कार्यरत आहे. गरजू रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध व्हावी, यासाठी विविध भागांमध्ये अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येते. नागरिकांनी याचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## जिगाव प्रकल्पासाठी शेतकऱ्यांना २५ टक्के वाढीव मोबदला; लोकअदालतच्या माध्यमाने भूसंपादन

जनप्रवास : प्रतिनिधी

बुलढाणा : बुलढाणा जिल्ह्यातील महत्वाकांक्षी आणि जिल्ह्याच्या घाटाखालील तालुके सुजलाम सुफलाम करण्याची क्षमता असलेल्या जिगाव सिंचन प्रकल्पाच्या भूसंपादनासंदर्भात शेतकऱ्यांना २५ टक्के वाढीव मोबदल्याचा प्रस्ताव आठवड्यात तयार करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.

बुलढाणा : बुलढाणा जिल्ह्यातील महत्वाकांक्षी आणि जिल्ह्याच्या घाटाखालील तालुके सुजलाम सुफलाम करण्याची क्षमता असलेल्या जिगाव सिंचन प्रकल्पाच्या भूसंपादनासंदर्भात शेतकऱ्यांना २५ टक्के वाढीव मोबदल्याचा प्रस्ताव आठवड्यात तयार करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.बुलढाणा जिल्ह्यातील प्रलंबीत जिगांव सिंचन प्रकल्प संदर्भात मुंबई स्थितमंत्रालयात काल मंगळवारी, २९ एप्रिल रोजी आढावा बैठक पार पडली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली काल संध्याकाळी पार पडलेल्या झालेल्या बैठकीला अपर मुख्य सचिव दीपक कपूर, जलसंपदा सचिव डॉक्टर संजय बेलसरे, मुख्य अभियंता संजय टाटू, अश्विनी सैनी आणिबुलढाणा जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील उपस्थित होते.

जिगांव बृहत प्रकल्प बाधित हजारो शेतकऱ्यांनी ४० टक्के वाढीव भुसंपादन मोबदल्याची आग्रही मागणी केली आहे. सध्या शेतकऱ्याचे ८ हजार ७८२ दावे प्रलंबित आहेत. यावर बैठकीत चर्चा विनिमय करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांना २५ टक्के वाढीव मोबदला देण्याचा प्रस्ताव तयार करून आठ दिवसात सादर करावा, असे स्पष्ट आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.

## कृषी योजनांसाठी ‘ॲग्रिस्टॅक’ नोंदणी करणे बंधनकारक

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : राज्यातील कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची ‘ॲग्रीस्टॅक’ योजना राबविण्यात येत आहे. ग्रीस्टॅक नोंदणी करुन शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी) काढल्याशिवाय कृषी विभागाच्या योजनांचा लाभ मिळणार नसल्याने सर्व शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे.

ॲग्रीस्टॅक योजनेमुळे शेतकऱ्यांना पीएम किसान योजना, पीक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत नुकसान भरपाई, पीक कर्ज आदी विविध योजनांचा थेट लाभ मिळणार असून डिजिटल पद्धतीने जमीन नोंदीमुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च वाचणार आहे. या योजने अंतर्गत सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरित्या तयार करण्यात येत आहे.

पीएम किसानच्या लाभार्थीपैकी ८७ हजार शेतकऱ्यांनी अद्यापही ग्रिस्टॅक नोंदणी केलेली नाही. उर्वरित शेतकऱ्यांनी तात्काळ नोंदणी न केल्यास त्यांना पीएम किसान योजनेचा व कृषी विभागाच्या इतर योजनांचा लाभ मिळण्यास अडचण येईल. अडचण येवू नये म्हणून शेतकऱ्यांनी तात्काळ पोर्टलवर नोंदणी करावी.

ग्रिस्टॅक योजनेच्या नोंदणीसाठी सातबारा, आधारकार्ड हे कागदपत्रे आणि आधार कार्ड लिंक असलेला दूरध्वनी क्रमांक आवश्यक आहे. ग्रिस्टॅक योजनेच्या नोंदणीसाठी संबंधित शेतकऱ्यांनी जवळच्या नागरी सुविधा केंद्राशी तसेच संबंधित गावातील ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहायक, ग्रामविकास अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. तसेच शेतकरी स्वतः https://mhfr.agristack.gov.in/farmer-registry-mh// या लिंकवर जाऊन ग्रिस्टॅक नोंदणी करू शकतात. कुटुंबातील प्रत्येक सातबारा धारक सदस्यांनी यामध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे, असेही श्री. काचोळे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

## महाराष्ट्र दिनानिमित्त राजधानीत विविध कार्यक्रम

जनप्रवास : प्रतिनिधी

नवी दिल्ली : महाराष्ट्र राज्याचा ६६ वा स्थापना दिवस गुरूवारी १ मे रोजी साजरा होणार आहे या निमित्ताने राजधानी दिल्लीत विविध कार्यक्रम साजरे करण्यात येत आहे. कस्तुरबा गांधी मार्ग आणि कोपरनिक्स मार्गावरील महाराष्ट्र सदनांमध्ये सकाळी निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांचा हस्ते ध्वजारोहणाचा मानाचा सोहळा संपन्न होईल.

दिल्लीतील उपराज्यपाल कार्यालयातर्फे सायंकाळी महाराष्ट्र आणि गुजरात स्थापना दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास दिल्लीचे उपराज्यपाल विनय कुमार सक्सेना, मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा यांच्या



प्रमुख हा विशेष कार्यक्रम होणार आहे.

यावेळी दिल्लीत विविध क्षेत्रांत कार्यरत मराठी भाषिक व्यक्तींशी संवाद साधून त्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देतील. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वैभवाचे प्रदर्शन या ठिकाणी होईल. कस्तुरबा गांधी मार्गावरील महाराष्ट्र सदनात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ठेव्याला जागर करणारा खास सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी खात्याच्या सहकार्याने आणि कोकण हापूस आंबा उत्पादक संघ, देवगड, सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते ३ मे दरम्यान भौगोलिक मानांकन प्राप्त हापूस आंब्याचे विक्री प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. ‘महाराष्ट्राचा सुगंधी राजा’ हापूस आंब्याची खरेदी करण्याची ही सुवर्णसंधी दिल्लीकरांना उपलब्ध होणार आहे.

## नागरिकांना वेळेत सुविधा मिळण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे : राज्यमंत्री माधुरी मिसाळ

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : पुणे महानगरपालिका आणि महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी महामंडळ (महाप्रित) यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे महापालिकेच्या हद्दीत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची गुणवत्ता अबाधित राखून वेळेचे काटेकोर नियोजन करावे. नागरिकांना वेळेत सुविधा मिळाव्यात यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

पुणे महानगरपालिका आणि महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी महामंडळ (महाप्रित) यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे महापालिकेच्या हद्दीत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची आढावा बैठक नगरविकास, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली बीकेसी येथील महाप्रितच्या कार्यालयात झाली.

यावेळी महाप्रितचे व्यवस्थापकीय संचालक श्री. माळी, पुणे महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे, उपायुक्त महेश पाटील, विद्युत विभागाच्या मुख्य अभियंता मनीषा सेकटकर, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी गणेश सोनवणे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



या प्रकल्पांच्या माध्यमातून पुणेकरांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्यासाठी आणि नव्याने समाविष्ट गावांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शासन पूर्णपणे कटिबद्ध आहे. महापालिका व महाप्रित यांच्यातील प्रभावी सहकार्यामुळे पुणे शहराचा विकास अधिक गतिमान होत आहे. स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. या उपक्रमांमुळे पुणेकरांचे जीवन अधिक सुखकर व सुविधा संपन्न होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले जात असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत पुणे महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील पायाभूत सुविधांच्या विकास प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये पुढील महत्त्वाच्या योजनांवर चर्चा करण्यात आली.

एलईडी विद्युत दिव्यांचे रूपांतर: नवसमाविष्ट गावांतील जुन्या विद्युत दिव्यांना एलईडी तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक दिव्यांमध्ये रूपांतरित करण्याचे काम वेगाने सुरू असून, एकूण ७०,००० दिव्यांचे रूपांतर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत ९,००० दिव्यांचे रूपांतर पूर्ण झाले असून, यामुळे ऊर्जा बचतीसोबतच देखभाल खर्चातही लक्षणीय घट होणार आहे.

सौरऊर्जा प्रकल्प पर्यावरणपूरक विकासासाठी ५० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पावर भर देण्यात येत असून, हा प्रकल्प लवकरच अंमलात आणला जाणार आहे.

आधुनिक आदेश व नियंत्रण केंद्र सुमारे २८३ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पात आपत्ती व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण, सार्वजनिक सुरक्षितता, जल व्यवस्थापन आणि घनकचरा व्यवस्थापन यांसारख्या सेवा एका केंद्रीकृत प्लॅटफॉर्मवर नियंत्रित केल्या जाणार आहेत. यामुळे शहराच्या व्यवस्थापनात अधिक वेग आणि कार्यक्षमतेची भर पडणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

* संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com